

पनवेल : भाजपतर्फे आयोजित श्री रामगाथा कार्यक्रमात पनवेलकर रामनामात न्हाऊन गेले!

रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १६ ◆ अंक १८६

www.ramprahar.com

# राम प्रहर

सोमवार, २२ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

मराठा सर्वेक्षणासाठी पनवेल महापालिकेचे मनुष्यबळ/३

माथेरानचा पारा १३ अंशांवर; गुलाबी थंडीचा अनुभव/७

आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत आरसीएफ शाळा चॅम्पियन/८

# अयोध्येत आज रामलल्लाची प्रतिष्ठापना

## अवघ्या देशवासीयांची उत्सुकता शिगेला

**अयोध्या : वृत्तसंस्था**

**येथील श्रीराम मंदिरात सोमवारी (दि. २२) प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. प्रभू श्रीरामाच्या स्वागतासाठी राममंदिर फुलांनी आणि विद्युत रोषणाईने सजले आहे. अयोध्येमध्ये खास दिपोत्सवही पहायला मिळणार आहे. प्रभू श्रीरामाची नगरी अयोध्या लक्ष-लक्ष दिव्यांनी उजळून निघणार आहे.**





श्रीराम मंदिरात रामलल्लाचा अभिषेक आणि प्राणप्रतिष्ठा होणार आहे. अभिषेक सोहळ्यानंतर संध्याकाळी अयोध्या नगरी दिव्यांनी सजवली जाईल. या वेळी अयोध्येत १० लाख दिवे लावण्याची तयारी सुरू आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळा पूर्ण झाल्यानंतर २२ जानेवारीच्या संध्याकाळी अयोध्या १० लाख दिव्यांनी उजळून निघणार आहे. शरयू नदीच्या काठावर मातीपासून बनवलेल्या दिव्यांनी अयोध्या उजळून निघणार आहे. याशिवाय, अयोध्येतील घर, दुकाने, आस्थापना आणि पौराणिक स्थळांवर 'रामज्योती' प्रज्वलित करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

अयोध्येत रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी सात हजार १४० निमंत्रक हजेरी लावणार आहेत. शिवाय ११२ परदेशी पाहुणेही सोहळ्यात सहभागी होणार आहेत. अयोध्येत १५० चार्टर्ड विमान उतरणार आहेत. अयोध्या नगरीला छावणीचे रुप आले आहे. येथे जागोजागी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. विनानिमंत्रण कुणालाही अयोध्येत परवानगी नाही. याशिवाय अयोध्येवर ड्रोनच्या माध्यमातून नजर ठेवली जात आहे.

# पनवेल तालुक्यात विकासाची गंगा

## शिवकरमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न आणि पाठपुराव्यामुळे मतदारसंघात अनेक विकासाची कामे सातत्याने सुरू आहेत. या अंतर्गत शिवकर ग्रामपंचायतीमध्ये आमदार निधी, महारष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभाग २५/१५ आणि ग्रामपंचायत १५व्या वित्त आयोग अंतर्गत रविवारी (दि. २१) विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या कामांसाठी तीन कोटी २४ लाख ७३ हजार ६८ रुपये मंजूर करण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशनच्या हर घर जल हर घर नल अभियानांतर्गत शिवकर गावात पाण्याची पाईपलाईन टाकणे व नवीन टाकी बांधणे एक कोटी २६ लाख ७९ हजार ७३४ रुपये, नळ पाणीपुरवठा करणे व मुख्य पाईपलाईन ते पाण्याच्या टाकीपर्यंत पाईपलाईन टाकणे १० लाख रुपये, ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत स्मशानभूमी सुशोभीकरण १५ लाख रुपये, परिसर सुधारणा दोन लाख रुपये, स्मशानभूमी येथे नवीन बोअरवेल व नवीन पाण्याची टाकी बसविणे एक लाख ३९ हजार ४९५ रुपये, नामदेव तुपे ते लक्ष्मण तुपे यांच्या घरापर्यंत रस्ते काँक्रीटीकरण चार लाख, बाळाराम कमलू भगत ते तुकाराम विठ्ठल पाटील घरापर्यंत रस्ता नऊ लाख रुपये, रवी भगत ते प्रकाश धर्म ढवळे यांच्या घरापर्यंत रस्ते काँक्रीटीकरण करणे १० लाख रुपये, रामदास जानू ढवळे ते हरिश्चंद्र धर्मा ढवळे यांच्या घरापर्यंत रस्ते काँक्रीटीकरण करणे आठ लाख रुपये, अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे या कामासाठी आठ लाख रुपये, सामाजिक सभागृह बांधणे १० लाख रुपये, ग्रामपंचायत कार्यालय परिसर सुशोभीकरण एक लाख रुपये, कार्यलयातील दुरूस्ती चार लाख ६३ हजार ८३९ रुपये, ग्रामपंचायत वारकरी भवन बांधणे टप्पा २ कामासाठी दोन लाख रुपये, प्रमोद चौधरी ते धनंजय पाटील यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटार तयार करणे १० लाख रुपये, संदीप तुपे ते अनंत ढवळे यांच्या घरापर्यंत **(पान २ वर..)**



## मूर्खांना मी उत्तर देत नाही -उपमुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरहून अयोध्येत जात असतानाचा स्वत:चा फोटो ट्विट केला होता. यावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी



देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. यावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी, मी मुर्खांना उत्तर देत नाही, असा टोला लगावला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी उत्तर देण्याच्या भानगडीत पडणार नव्हतो, कारण हे तेच लोक आहेत ज्यांनी रामाचे अस्तित्व नाकारले होते. ज्या लोकांनी राम खरेच त्या ठिकाणी जन्माला आले होते का, असा प्रश्न विचारला होता, जे खरेच रामाला मानायला तयार नाहीत त्यांना मी कशाला उत्तर देऊ? त्यामुळे मी मुर्खांना उत्तर देत नाही. मी माझ्या आनंदासाठी हा फोटो ट्विट केला, असे त्यांनी सांगितले.

## 'मराठा आरक्षणासंदर्भातील काम युद्धपातळीवर; आंदोलन थांबवावे'



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी शनिवारी (दि.२०) मराठा आंदोलक मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणेच काम सुरू असून त्यांनी आंदोलन थांबवावे, असे आवाहन मुख्यमंत्री आवाहन एकनाथ शिंदे यांनी केले आहे. मुख्यमंत्री शिंदे मराठा आरक्षण आंदोलनाबाबत रविवारी (दि. २१) माध्यमांशी बोलत होते.

ते म्हणाले की, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकार सकारात्मक आहे, मनोज जरांगे पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणे काम सुरू आहे. त्यांनी आंदोलन थांबवले पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले. सरकार राज्यभर कुणबी नोंदी शोधत आहे, मोठ्या प्रमाणात सापडत आहेत. मागावर्ग आयोग काम करीत आहे, जस्टीस शिंदे समितीची लोक राज्यात काम करीत आहे. दीड लाख लोक तीन शिफ्टमध्ये काम करीत आहे. राज्य सरकार फेब्रुवारी महिन्यात विशेष अधिवेशन घेऊन मराठा समाजाला आरक्षण देईल, इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण दिले जाईल, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# उरण-खारकोपर रेल्वे सुविधांबाबत आमदार महेश बालदी यांचा पुढाकार



**उरण : रामप्रहर वृत्त**

मुंबई आणि नवी मुंबई भागातून जेएनपीटी बंदरापर्यंत वाहतूक सुलभ, खारकोपर ते उरणपर्यंत उपनगरीय रेल्वेसेवेचा विस्तार केल्यास उरण परिसराची नवी मुंबई आणि मुंबईशी चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल या हेतूने नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या रेल्वेस्थानकातील सोयीसुविधांबाबत आमदार महेश बालदी यांनी मुंबई मंडळ सीएसटी रेल्वेचे डीआरएम संजय कुमार जैन यांची भेट घेतली.

उरण-नेरूळ-बेलापूर-खारकोपर उपनगरीय रेल्वेसेवा सुरू केल्याने विद्यार्थी, व्यापारी आणि दैनंदिन प्रवाशांना मोठा फायदा होईल. अलिबाग हॉलिडे डेस्टिनेशनला चांगली कनेक्टिव्हिटी मिळाल्याने या भागातील पर्यटनाला चालना मिळणार आहे. उरण येथून बेलापूर आणि नेरूळ अशी अर्ध्या तासाला लोकल धावणार आहे. तर बेलापूर आणि नेरूळ येथून एका तासाने लोकल उरणकरीता सुटणार आहे. सकाळ आणि संध्याकाळी या मार्गावर गर्दी असते. या कालावधीत दहा फेऱ्या चालवल्या जाणार आहेत, मात्र सकाळी व सायंकाळी विद्यार्थ्यांसह कार्यालयीन कर्मचाऱ्यांची गर्दी पाहता रेल्वेसेवेची वेळ वाढविण्याची मागणी आमदार महेश बालदी यांनी केली. त्याचप्रमाणे स्थानिक रिक्षाचालकांसाठी स्टेशन परिसरात रिक्षा स्टँड उभारणे व स्थानिक लोकांची रेल्वेमध्ये भरती करण्याबाबतही आमदार महेश बालदी यांनी संजय कुमार जैन यांच्याशी सकारात्मक चर्चा केली.

या बैठकीला उरण भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, कोटगाव अध्यक्ष तथा युवा शहर अध्यक्ष निलेश पाटील उपस्थित होते.


## सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या समाधीस्थळ सुशोभिकरणाचे भूमिपूजन



**अलिबाग : प्रतिनिधी**

सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या अलिबाग येथील समाधीस्थळाचे सुशोभीकरण प्रकल्पांतर्गत पाच कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते रविवारी (दि.२१) करण्यात आले.

आमदार महेंद्र दळवी, पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, **(पान २ वर..)**



# स्वच्छता मोहीमेमुळे प्रदूषण घटले

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुंबईत प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहरात संपूर्ण स्वच्छता मोहीम अखंडपणे राबवण्यात येत असून संपूर्ण स्वच्छता मोहीमेंतर्गत आज कुर्ला परिसरातील अनेक मंदिरांची स्वच्छता करण्यात आली. संपूर्ण स्वच्छता मोहीमेमध्ये स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. मुंबईत राबवण्यात येत असलेल्या संपूर्ण स्वच्छता मोहीमेमुळे मुंबई शहरातील प्रदूषणाची पातळी घटली असून प्रदूषणाची पातळी ३५० वरून १०० ते ८० पर्यंत खाली आली आहे. हे या संपूर्ण स्वच्छता मोहीमेचे यश असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज कुर्ला परिसरातील शिवसृष्टी येथील श्री गणेश मंदिर, श्री. नंदिकेश्वर मंदिर, श्री हेरंब मंदिर, सिद्धेश्वर सहकारी गृह निर्माण संस्था, श्री शनैश्वर मंदिर, चेंबुर येथे सपूर्ण स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी खासदार राहुल शेवाळे, आमदार मंगेश कुडाळकर, माजी आमदार तुकाराम काते, अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) पी. वेलरासू, उपायुक्त (परिमंडळ - ५) हर्षद काळे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) संजोग कबरे, सहायक आयुक्त धनाजी हेर्लेकर, अलका ससाणे उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, संपूर्ण स्वच्छता मोहीम ही एक जन चळवळ झाली आहे. टप्प्या टप्प्याने संपूर्ण स्वच्छता मोहीम राज्यात राबवण्यात येत असून या मोहीमेच्या माध्यमातून लवकरच राज्य स्वच्छ, सुंदर व हरित होण्यास मदत होणार आहे. या अभियानामध्ये लोक उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेचा संदेश दिला आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी होणाऱ्या आयोध्या येथील श्री राममूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने देशभरातील मंदिरांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्याला देशातील सर्व नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. यामुळे संपूर्ण स्वच्छता मोहीमेला गती मिळाली आहे. मुंबईतही अनेक मंदिरांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात येत आहे. आज कुर्ला येथील अनेक मंदिरांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहीमेचे खरे हिरो हे स्वच्छता कर्मचारी आहेत. दिवस रात्र हे कर्मचारी मुंबई स्वच्छ ठेवण्यासाठी काम करत असल्याचेही सांगून मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. मुंबईची जगभरात एक वेगळी ओळख आहे. या ठिकाणी देश, विदेश तसेच जगभरातून नागरिक येत असतात. म्हणून त्यांना अपेक्षित अशी मुंबई पाहण्यासाठी स्वच्छ मुंबई व सुंदर मुंबई करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून डिप क्लिन ड्राईव्ह ही मोहीम सुरू केली आहे. या मोहीमेच्या माध्यमातून सिडको, एमएमआरडीए आणि मुंबई महापालिका यांच्यामार्फत विविध विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. या मोहीमेला शालेय आणि महाविद्यालयातील विद्यार्थी, विविध सामाजिक संस्था, सफाई कर्मचारी तसेच शासकीय यंत्रणांसह नागरिक उर्त्फूतपणे प्रतिसाद देत आहेत.

या वेळी परिसरातील नागरिक, तरुण मंडळांचे कार्यकर्ते, मंदिरांचे विश्वस्त, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मोहीमेदरम्यान मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वच्छता कर्मचारी, परिसरातील नागरिक आणि भाविक यांच्याशी संवाद साधला.

दरम्यान, कुर्ला पूर्व भागात स्वच्छता मोहीम आटोपून परतत असताना रस्त्याच्या कडेला जाणारी दोन लहान मुले मुख्यमंत्री शिंदे यांनी दिसली. या मुलांच्या हातात गदा होती. रस्त्याने आपल्या आईसोबत चालत जाणारी ही गदाधारी मुले पाहून मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचा ताफा थांबवला. स्वतः त्या लहान मुलांना जवळ बोलावले. त्या लहानग्यांशी त्यांनी संवाद साधला आणि त्यांच्यासोबत फोटोही काढला. मुख्यमंत्री शिंदे यांच्या या आपुलकीच्या वागणुकीने ही लहान मुले भारावून गेल्याचे या वेळी दिसले.

# लायन्स क्लब ऑफ अलिबागचा फेस्टीव्हल २५ जानेवारीपासून

**अलिबाग : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या वतीने येत्या २५ ते २९ जानेवारीला अलिबाग फेस्टीवलचे आयोजन करण्यात आले आहे. पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात विवीध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. नवउद्योजकांनी व्यवासायाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासासठी १७० स्टॉल्स या निमित्याने उपलब्ध करून दिले जाणार असल्याची माहिती लायन्स क्लबचे अध्यक्ष संजय पाटील यांनी दिली. ते कुरूळ येथील क्षैत्रिक्य माळी सभागृहात आयोजीत पत्रकार परिषदेत बोलत होते.

दरवर्षी जानेवारी महिन्यात या महोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षीही अलिबाग येथील समुद्र किनाऱ्यावरील मोकळ्या मैदानात महोत्सवाचे आयोजन केले जाणार आहे. तर आसपासच्या परीसरात पार्कीगची व्यवस्था केली जाणार आहे.

पाच दिवस चालणाऱ्या या महोत्सवात दर्जेदार कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. सालाबाद प्रमाणेच कराओके गायन स्पर्धा, पाककला स्पर्धा. शरीर सौष्टव, फॅशन शो, हेअर अँण्ड मेकअप शो या साऱख्या स्पर्धांचा समावेश असणार आहे. नवउद्योजकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी १७० स्टॉल्सची उभारणी केली जाणार आहे. खाद्यपदार्थ, विविध वस्तु, कपडे, बँका, विमा कंपन्यांचे स्टॉल्स यांचा यात सहभाग असणार आहे. अलिबागकरांनी या फेस्टीव्हलमध्ये मोठ्या संख्येनी सहभाग घ्यावा असे आवाहन पाटील यांनी या वेळी केले.

लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या स्थापनेला यंदा ५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्यामुळे वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवण्याचा मानस संस्थ्या पदाधिकाऱ्यांनी या वेळी व्यक्त केला. संस्थेच्या माध्यमातून अलिबाग चोरंढे येथे मल्टीस्पेशॅलीटी हॉस्पीटलची उभारणी करण्यात येत असल्याचेही या वेळी पाटील यांनी सांगितले. या वेळी फेस्टीव्हलचे अध्यक्ष अनिल म्हात्रे आणि पदाधिकारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# नवी मुंबई पोलीस सहकारी पतपेढी निवडणूकीत ‘परिवर्तन’



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस सहकारी पतपेढी-२०२४च्या निवडणूकीत परिवर्तन पॅनलमधील सर्व उमेदवारांनी दणदणीत विजय मिळविल्याने त्यांचे पोलीस वर्गाकडून अभिनंदन होत आहे. निवडणूकीमध्ये एकूण तीन पॅनल आणि १४ अपक्ष उमेदवार पात्र झाले होते. त्यांनतर मतमोजणी पूर्ण होऊन परिवर्तन पॅनल मधील सर्व उमेदवार हे बहुमतांनी निवडून आले आहेत. त्यामध्ये (सर्व साधारण गट - ओपन) १) अमोल गागरे - १३५७, २) अजित म्हात्रे - १३४४, ३) इंद्रजित कानू - ११६०, ४) विकास देवरे - १०७०,५) हणमंत दळवी - १०१०, ६) श्रीधर आहेर - ९४६, महिला राखीव मध्ये १) धन्वंतरी गाडगीळ - १२००,२) अंजली कांबळे - ११३२, तसेच इतर मागास प्रवर्ग (जइउ) १) हेमंत सुर्यवंशी - ७९५, अनुसूचित जाती मध्ये (SC/ ST - VJNT) १) कमलाकर सोनावने - ११२८, २) रोहित राठोड - ११३८ हे विजयी झाले आहेत. त्याबद्दल अजित जगन्नाथ म्हात्रे यांनी मतदार पोलीस बंधू भगिनी यांनी जो विश्वास प्रेम आणि पाठिंबा परिवर्तन मधील सर्व उमेदवार यांना दिला त्यामुळे अशक्य ही शक्य झाले असल्याचे सांगितले आहे.

# उरण महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण महाविद्यालयातील शिक्षक शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यासाठी सेबी यासंस्थेंतर्गत तसेच आयक्यूएसी, अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. हन्नत शेख यांनी केले. कार्यक्रमास लाभलेले रिसोर्स पर्सन सुषमा दास सेबी भांडवल बाजार ट्रेनर यांनी सेबीचे कार्य, भांडवल बाजार, पैसा गुंतवणूक, शेअर मार्केट, बीएसई आणि एन एस इ. आजच्या विद्यार्थ्यांना गुंतवणुकीची गरज आवश्यकता या विविध विषयाच्या संदर्भामध्ये त्यांनी उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. पाहुण्यांचे स्वागत आणि परिचय डॉ. एच के जगताप यांनी केले. प्राचार्य श्यामा सर यांनी मानवी जीवन बचत गुंतवणूक आणि अध्यात्म याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार डॉ. ए. आर. चव्हाण यांनी मानले आणि या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी.आर. कारुळकर यांनी केले या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांनी प्रश्न विचारले आणि त्या प्रश्नास व्यास यांनी समर्पक असे उत्तरे दिली. कार्यक्रम आदरणीय प्राचार्य के. ए. शामा सर यांच्या मार्गदर्शनाने झाला.

# श्री लक्ष्मी नारायण मंदिरात शेकडोंच्या उपस्थितीत आरती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाज, पनवेल आणि श्री लक्ष्मनारायण मंदिर न्यास यांच्या श्री लक्ष्मी नारायण मंदिरात शनिवारी (दि.२०) सायंकाळी रामनाम जपानंतर झालेल्या आरतीला पाचशेपेक्षा जास्त रामभक्त उपस्थित होते.

राम मंदिर सोहळ्यानिमित्त श्री लक्ष्मीनारायण मंदिर विविध रंगीत विद्युत माळांच्या सजावटीमुळे नेत्रदीपक दिसत होते.कळसावर केलेल्या रंगीबेरंगी विद्युतझोत रोषणाईने मुळात सुंदर असणारा कळस आणखीनच खुलून दिसत होता.

या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाजाचे अध्यक्ष योगेश राजे, सचिव गिरीष गडकरी, सहसचिव नीलिमा गडकरी, खजिनदार महेश कर्णिक, विश्वस्त मिलिंद देशपांडे, संदीप देशमुख, श्रीकृष्ण चित्रे, कविता चित्रे, संतोष देशपांडे, राहुल देशपांडे, सलील पत्की व श्री शेत्र राम जन्मभूमी न्यास युवा वॉरियर ग्रुप उपस्थित होते.



## पान १ वरुन

### पनवेलच्या विकासाची गंगा

बंदिस्त गटार तयार करणे या कामासाठी २.४० लाख रुपये, अंतर्गत गटार तयार करणे आठ लाख रुपये, बौद्धवाड्या परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण १५ लाख रुपये, नारायण कांबळे ते बुद्धविहाराकडे जाणारा रास्ता कॉंक्रीटीकरण १५ लाख रुपये, बौद्धवाड्यातील प्रदीप कांबळे ते नारायण कांबळे यांच्या घरापर्यंत दिवाबत्ती लावणे चार लाख रुपये, मुस्लिम कब्रस्थान संरक्षण भिंत बांधणे १० लाख रुपये, तलाव सुशोभीकरण १० लाख रुपये, तलावाला संरक्षण भिंत बांधणे १० लाख रुपये, ग्रामपंचायत हद्दीतील सर्व विहिरींचा गाळ काढणे व साफसफाई करणे १.५० लाख रुपये, शिवकर ते मोहो गावाजवळील मोरी ते भगवान फडके मोहो रस्ता तयार करणे नऊ लाख रुपये, ग्रामपंचायत हद्दीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे तीन लाख रुपये या सर्व कामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी दत्तात्रेय पाटील, समीर पोपेटा, शंकर महाराज आंग्रे, दादा महाराज, सरपंच आनंद ढवळे, उपसरपंच प्रांजल पाटील, सदस्य रवींद्र ढवळे, मंगेश ढवळे, सदस्या रेश्मा पाटील, संतोष मते, सुरेखा टोपले, मनिषा ढवळे, रितू पाटील, मोनिका पोपेटा यांच्यासह भाजप पळस्पे विभागीय अध्यक्ष अनिश ढवळे, मनोहर ढवळे, हनुमान ढवळे, चंद्रकांत ढवळे, जयदास ढवळे, तुकाराम टोपले, नामदेव तुपे, माया पाटील, चांगदेव ढवळे, गोपाळ पाटील, गोटीराम ढवळे, तुकाराम तुपे, त्रिंबक ढवळे, अंबाजी ढवळे, गोपिनाथ ढवळे, हरिश्चंद्र ढवळे, परशुराम ढवळे, नजिर शेख, जिलानी शेख, जुम्मादीन शेख, खलील शेख, रामदास पाटील, बच्चू ढवळे, अरूण पाटील, जगदीश ढवळे, संदिप ढवळे, राजकुमार ढवळे, सागर ढवळे, पराग ढवळे, अरविंद माळी, अक्षय पाटील, निखिल चोरघे, संतोष ढवळे, बाळ्या ढवळे, अनंता पाटील, राम पवार, नितीन पाटील, दर्शन ढवळे, चेतन ढवळे, समीर पाटील, मच्छिंद्र मते, नितीन ढवळे, अभिषेक पाटील, गणेश भगत, सखाराम चौधरी, दविक ढवळे, आकाश ढवळे, अमेय ढवळे, पुजा ढवळे, किर्ती ढवळे, सुगंधा पोपेटा, अरूणा चौधरी, मिनाक्षी ढवळे, अंजली ढवळे, मनिषा ढवहे, निकिता ढवळे, पुनम पाटील, हर्षदा ढवळे, सोनाली ढवळे, नर्मदा पाटील, रेश्मा पाटील, प्राजक्ता पाटील, प्रिती पाटील, आरती पाटील, संगिता ठाकूर, जनी पाटील, आरती पाटील, प्रदीप ढवळे, तन्मय ढवळे, तुषार टोपले, जयेश ढवळे, सचिन कांबळे, शशांक पाटील, गुरूनाथ पाटील, प्रकाश पाटील, भरत चौधरी, दीपक म्हात्रे, हरेश्वर पाटील, रोहन टापले यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### सरखेल कान्होजी राजे आंग्रे यांच्या समाधीस्थळ सुशोभिकरणाचे भूमिपूजन

माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, आंग्रे घराण्याचे वंशज रघुजीराजे आंग्रे, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आदी या वेळी उपस्थित होते.

आंग्रे समाधीस्थळ उद्यानाच्या प्रवेशद्वारावर भव्य गलबताच्या प्रतिकृतीची उभारणी करणे, संरक्षक भिंतीवर कोरीव काम करून, किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारणे, एफआरपी मटेरियलच्या दिपमाळांची उभारणी करणे, कान्होजी राजे आंग्रे यांच्या जीवनावरील म्यूरल्स तयार करणे, उद्यानात रोषणाई करणे यासाठी लागणारे आवश्यक बांधकामे करणे ही कामे या योजनेंतर्गत केली जाणार आहेत.

ऐतिहासिक वारसास्थळांचे जतन करून त्यांचा इतिहास पुढच्या पिढीपर्यंत पोहचवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. जिल्ह्याच्या वारसास्थळांच्या संवर्धनासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

समाधीस्थळाच्या सुशोभिकरणाचे पहिल्या टप्प्यातील काम आज सुरू होत आहे. हे काम सुरू असतानाच दुसऱ्या टप्प्यातील कामे प्रस्तावित करून त्याचा प्रस्ताव तातडीने सादर करावा म्हणजे उर्वरीत निधी मंजूर करता येऊ शकेल, असे त्यांनी या वेळी सांगितले. अलिबाग शहराच्या विकासाठी १२५ कोटींची कामे मंजूर करण्यात आली आहे. ही कामे लवकरच सुरू होतील, असे आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले.

आंग्रे समाधीस्थळाच्या सुशोभीकरणासाठी मंत्री आदिती तटकरे पालकमंत्री असताना प्रादेशिक पर्यटन योजनेतून दोन कोटींचा निधी मंजूर केला होता. या कामासाठी आणखी निधी लागणार असल्याने नावीन्यपूर्ण उपक्रमातून तीन कोटी रुपयांचा निधी मी मंजूर करून घेतला. त्यामुळे समाधीस्थळाच्या विकास आराखड्यातील पहिल्या टप्प्यातील कामे आता पूर्ण केली जातील. नंतर दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही आमदार दळवी यांनी दिली.

# करंजाडे परिसरातील सर्व भाविकांनी सोहळ्यात सहभागी व्हावे- सरपंच शेलार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्या क्षणाची अवघ्या देशाला प्रतीक्षा होती, तो क्षण आता येऊन ठेपला आहे. सोमवारी अयोध्येत श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. या धर्तीवर सोमवारी (दि.२२) संपूर्ण देश विदेशामध्ये श्री राम प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्ती भावाने साजरा होणार आहे. या अनुषंगाने करंजाडे परिसरातही विविध ठिकाणी, मंदिरांमध्ये व सोसायट्यांमध्ये धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. सर्वांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन सरपंच मंगेश शेलार आणि श्री राम जन्मभूमी तिर्थक्षेत्र न्यास, करंजाडे व परिसर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

सकाळी ७.३० वाजता करंजाडे सेक्टर ६ पासून पायी दिंडी सोहळा सुरू होईल. त्यानंतर करंजाडे गावातील मारूती मंदिरात अभिषेक, भजन व दुपारी महाप्रसाद, रात्री दीपोत्सव साजरा होणार आहे. त्रिवेणी धाम मंदिर येथे होमहवन व सकाळी १० वाजल्यापासून प्राणप्रतिष्ठा सोहळा कायक्रम आणि संध्याकाळी महाप्रसाद होणार आहे. यासह आई माता मंदिर येथे सिरवी समाजातर्फे श्री राम उत्सवानिमित्त सकाळी विविध कार्यक्रम व रात्री दीपोत्सव साजरा होणार आहे. शिव मंदिर सेक्टर ६ येथे पूजन व दीपोत्सव तर कालभैरव मंदिर सेक्टर आर २ येथे दिपोत्सव व विविध कार्यक्रम त्याचबरोबर लक्ष्मी नारायण मंदिर सेक्टर आर ३ येथे भजन, प्राणप्रतिष्ठा सोहळा, मिरवणूक, दिपोत्सव व महाप्रसाद तसेच चिंतामणी गणेश मंदिर सेक्टर आर ४ येथे सकाळी कीर्तन, संध्याकाळी भजन, दीपोत्सव व प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. करंजाडेत सोमवारी सकाळी ७.३० वाजता भव्य पायी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे.



आषाढी वारी दिंडीप्रमाणे श्री राम नामाच्या जयघोषात हरिनामाचा गजर, भजन करीत सेक्टर ०६ चौक- सेक्टर ०५ चौक- मारुती मंदिर करंजडे गाव- सेक्टर ०४ मेन रोड- साई वृंदावन - सेक्टर ०३ रिलायन्स स्मार्ट येथून शीव रेसिडेन्सीच्या उजवीकडे- त्रिमूर्ती मल्हार सोसायटी- मेन रोड- सेक्टर ०२ रिक्षा स्टँड वरून उजवीकडून- त्रिवेणी धाम मंदिर- वामन चहा- दुधे विटेवरी- सेक्टर ३ कडून उजवीकडे आई माता मंदिर येथे समाप्ती व प्रसाद याप्रमाणे पायी दिंडी काढली जाणार आहे.

या दिंडी मध्ये सर्व संस्था, सोसायटी, लहानथोर, महिला, ज्येष्ठ नागरिक व करंजाडेतील सर्व रहिवासी सहभागी होणार आहेत. दिंडीत पुरूषांनी सफेद कुर्ता/ सदरा, धोतर, डोक्यावर टोपी कपाळावर टिळा असा पोशाख परिधान करावा तर महिलांनी साडी परिधान करावी. लहान मुलांनी श्री राम, लक्ष्मण, सीता आणि हनुमान यांची वेशभूषा सादर करावी. भजन मंडळींनी टाळ, पखवाज, मृदुंग, ढोल किंवा ढोलकी घेऊन यावे. तर दिवाळीप्रमाणे घरोघरी आणि सोसायटी मध्ये भगवा झेंडा लावावा. रांगोळी काढावी, दिवे, आकाशकंदील लावण्यात यावे आणि रोषणाईने घर सजवावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री रामाची ३६०० चौरस फुटांची रांगोळी

**नवी मुंबई :** स्वर्गीय रामचंद्र नाईक प्रतिष्ठान तर्फे कोपरखैरणे येथील रा. फ. नाईक विद्यालयाच्या पटांगणावर कलाकार श्रीहरी पवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी श्री रामाची ३६०० चौरस फुटांची महारांगोळी साकारण्यात आली आहे. तब्बल ७५० किलो विविध रंगांच्या रांगोळीचा वापर करण्यात आलेला आहे. सोमवारी ही महारांगोळी सर्वांना पाहण्यासाठी खुली राहणार आहे.

## दुखवटा

### पांडुरंग सुतार

**माणगाव :** तालुक्यातील पळसगाव खुर्द गावचे रहिवासी असलेले पत्रकार संतोष सुतार यांचे पिताश्री कै. पांडुरंग महादेव सुतार (वय ७२) यांचे बुधवारी (दि. १७) पळसगाव खुर्द येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सुतार कुटुंबीयांवर व पळसगाव खुर्द ग्रामस्थांवर शोककळा पसरली आहे. कै. पांडुरंग सुतार यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी (दि. २६) तर उत्तरकार्य विधी (बारावे) रविवारी (दि. २८) पळसगाव खुर्द येथे होणार आहे.



# मराठा समाज व खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणासाठी पनवेल पालिकेचे मनुष्यबळ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील मराठा आरक्षण व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्या आदेशानुसार रविवारी (दि. २१) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले.

प्रशिक्षणास उपायुक्त तथा सहाय्यक नोडल अधिकारी गणेश शेटे, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी संदीपान खुरपे, निवडणूक विभाग प्रमुख सदाशिव कवठे, आस्थापना विभाग प्रमुख नामदेव पिचड, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, अरविंद पाटील, रोशन माळी,सर्व पर्यवेक्षक व प्रगणक उपस्थित होते.

राज्य मागासवर्ग आयोगामार्फत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी २३ जानेवारीपासून युद्धपातळीवर सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी पनवेल महापालिकेची यंत्रणा सज्ज असून कालबद्धरितीने अचूक सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

मागासवर्ग आयोगाच्या सर्वेक्षणाचे काम २३ ते ३१ जानेवारी दरम्यान होणार आहे. या सर्वेक्षणासाठी पालिकेच्या वतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे कर्मचारी गृहभेटी देणार असून शासनाने दिलेल्या विहित नमुन्यातील माहिती संकलित करणार आहे. या कर्मचाऱ्यांना अचूक व बिनचूक माहिती द्यावी तसेच या कालावधीत उपलब्ध रहावे. हे काम अत्यंत महत्वाचे असल्याने या सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे, असे आवाहन उपायुक्त गणेश शेटे यांनी केले आहे.

पनवेल महापालिका हद्दीत घरोघरी जाऊन होणाऱ्या या सर्वेक्षणासाठी महापालिकेच्या वतीने सुमारे ६०० कर्मचारी व ४० पर्यवेक्षकांची निवड करण्यात आली आहे. या सर्वेक्षणासाठी शासनाच्या वतीने मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. खारघर, कळंबोली, कामोठे, पनवेल चारही प्रभागासांठी प्रभाग अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.



पनवेल : अयोध्येतील जानेवारीला होणाऱ्या श्रीराम प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त देशभरात मंदिर परिसर स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत पनवेल शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील गणपती मंदिर येथील साफसफाई करण्यात आली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, मिडलक्लास हौसिंग सोसायटी अध्यक्ष सुमित झुंजारराव, वर्षा प्रशांत ठाकूर, स्वाती कोळी, राजेश गीलडा, धोंडियाल, रोशन ठाकूर, स्वप्नील ठाकूर, प्रवीण मोरबाळे, संदीप पाटील, गौरव चव्हाण, धात्रक काका यांच्यासह सोसायटीतील नागरिकांनी सहभाग घेतला.

## रामलल्लाची उरण येथे भव्य शोभा यात्रा

**उरण : वार्ताहर**

५०० वर्षानंतर उभे राहतेय श्री रामाचे भव्य मंदिर या मंदिरात होणाऱ्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेच्या ऐतिहासिक मंगलदिनी होणाऱ्या या भव्यशोभा यात्रेत सहभागी होऊन संपूर्ण उरण 'राम'मय करावे असे आवाहन सर्व रामभक्तांना आमदार महेश बालदी आणि महेश बालदी मित्र मंडळ यांनी आवाहन केले आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



सकाळी १० वाजता राम मंदिर, गणपती चौक येथून शोभा यात्रेस प्रारंभ होइल पुढे राजपाल नाका, पालवी हॉस्पिटल, कामठा, पालवी हॉस्पिटल, जरिमरी मंदिर, बाजार पेठ, गांधी चौक राम मंदिर येथे दुपारी १२ वाजता सांगता होईल.

गणपती चौक उरण येथे अयोध्या येथील प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमाचे भव्य एलईडी स्क्रीन वर थेट प्रक्षेपण दाखविण्यात येणार आहे. दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत सेंटमेरी हायस्कूल मैदान उरण येथे सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शोभा यात्रेचे आयोजक आमदार महेश बालदी आणि महेश बालदी मित्र मंडळ यांनी दिली.



कामोठे : अस्सल मराठ मोळ्या चवीची पर्वणी असलेल्या हॉटेल सह्याद्री थाट या हॉटेलची दुसरी शाखा कामोठे सेक्टर १७ येथे सुरू करण्यात आली आहे. बापुसो शिंदे, विजय कळके, बाजीराव माने यांनी हे हॉटेल सुरू केले आहे. या हॉटेलचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी माजी नगरसेविका हेमलता गोवारी, भाजप कामोठे मंडळ सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, छावा फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष दामोदर चव्हाण, युवराज पाटील, वसंतराव वासके, प्रतापराव साळुंखे, नामदेव थोरात, अमोल गायकवाड, योगेश थोरात, अमोल कदम आदी उपस्थित होते. (छाया : अक्षय शार्दुल)



पनवेल : शहरातील छत्रपती शिवाजी चौक येथे फझल वोहरा, मुफद्द्ल लोखंडवाला, हुसेन वोहरा यांनी टी लॉजी या नव्याने सुरू केलेल्या चहाच्या दुकानाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत रविवारी झाले. या वेळी शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक राजू सोनी, बबन मुकादम, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाताणचे सरपंच तानाजी पाटील, उपसरपंच अरुण पाटील, प्रभाग १९चे अध्यक्ष पवन सोनी आदी उपस्थित होते.




पनवेल : बार कौंसिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवाच्या अंतर्गत येणाऱ्या पनवेल बार असोसिएशनच्या वतीने बेसिक लीगल एज्युकेशन प्रोग्राम रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात रविवारी आयोजित करण्यात आला होता. या वेळी सिव्हिल व क्रिमिनल हँड बुक्सचे वितरणही करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई हायकोर्टाचे जज एम.एस. कर्निक उपस्थित होते. यासोबतच माजी नगरसेवक तथा पीबीए प्रेसिडन्ट ॲड. मनोज भुजबळ, ॲड. जयंत जयभावे, राजेंद्र उमा, परिजात पांडे, गजानन चव्हाण, विठ्ठल देशमुख आदींची उपस्थिती लाभली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. २४) सायंकाळी ५ वाजता वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रोफेसर डॉ. बळीराम गायकवाड संचालक अध्ययन अध्यापन व विस्तार विभाग व प्रभारी कुलसचिव मुंबई विद्यापीठ हे उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे असणार आहेत तसेच संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर तसेच परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिता पाटील, प्रभाकर जोशी (सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर), दीपक शिंदे (सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर) या सर्वांची असणार आहे.

महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील प्रथम दुतीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच विजेते व त्यांचे पालक ही या समारंभासाठी उपस्थित राहणार आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी, पालक तसेच विजेत्यांना या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.

या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा समन्वयक सांस्कृतिक समिती यांनी केले आहे तसेच डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शिल्पा पाटील, प्रा. अंकिता जांगीड, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. राहुल कांबळे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी हा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मेहनत घेत आहेत.

## बेकायदा देशी दारूची विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई

पनवेल : तालुक्यातील वलप गाव व हेदुटणे गाव येथील किराणा दुकानात बेकायदेशीररित्या देशी दारूची विक्री करणाऱ्या दोन दुकानदारांविरूद्ध पनवेल तालुका पोलिसांची कारवाई केली आहे. तालुक्यातील अनेक किराणा दुकानांमध्ये बंदी असलेल्या गुटक्यासह देशी-विदेशी दारूची विक्री केली जात असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखालील पोलिसांच्या पथकाने छापे टाकून मोठ्या प्रमाणात देशी दारूच्या बाटल्या हस्तगत केल्या आहेत.

## वडघर येथील उर्दू शाळेत स्नेहसंमेलन

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद वडघर येथील उर्दू शाळेच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन झाले. या कार्यक्रमाकरिता प्रमुख अतिथी म्हणून उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, उद्योजक इकबाल काझी, माजी नगरसेवक मुकीद काझी, माजी ग्रामपंचायत सदस्य बशीर खान, माजी ग्रामपंचायत सदस्य समीनासाठी, महमद साठी, त्याचबरोबर रिपब्लिकन चळवळीचे नेते महेश साळुंखे तसेच परिसरातील अनेक नामवंत मंडळी आणि विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या कला गुणांची प्रगती व्हावी या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. सर्व उपस्थित पाहुण्यांचे बशीर खान यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.




## संपादकीय

# अवघा देश राममय

रामभक्तांची, कारसेवकांची गेल्या अनेक वर्षांची मेहनतरूपी तपश्चर्या आज फळाला येत आहे, कारण शरयू तिरी वसलेल्या अयोध्या नगरीत प्रभू श्री रामचंद्रांच्या मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा होत आहे. प्रदीर्घ संघर्ष व लढ्यातून, त्यागातून, प्रतीक्षेतून आज हा सुवर्णाक्षरांत लिहून ठेवण्याचा दिवस उगवला आहे. यानिमित्ताने संपूर्ण भारतभर आनंदाचे व उत्साहाचे वातावरण असून सर्वजण रामनामात दंग झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

**अयोध्येसह भारतभर आज सर्वत्र राम मंदिराची चर्चा आहे, पण यासाठी अनेकांनी आपले सर्वस्व वेचले आहे. देशातील सर्वांत प्रदीर्घ काळापासून सुरू असलेल्या संघर्षाचे एक प्रकरण राहिले आहे. राम जन्मभूमीवर उभे राहात असलेले राम मंदिर हे ४९५ वर्षांची प्रतीक्षा आहे. १५२८ ते २०२३ या काळात अनेक घडामोडी घडल्या. मुघल शासक बाबरचा सेनापती मीर बाकी याने अयोध्येतील रामकोट येथील राम जन्मस्थान या ठिकाणी मंदिर पाडल्यानंतर मशीद बांधल्याचा उल्लेख आहे. या बाबरी मशिदीच्या जागेवर पहिल्यांदा १८५३मध्ये धार्मिक हिंसाचार घडला. अवधच्या नवाब वाजिद शाहच्या राजवटीत निर्मोही या हिंदू पंथाने बाबरच्या काळात हिंदू मंदिर पाडण्यात आले होते, असा दावा केला. सहा वर्षांनंतर ब्रिटीशांनी जागेचे दोन भागांमध्ये विभाजन करण्यासाठी कुंपण बसवले. मुस्लिमांना मशिदीत प्रार्थना करण्याची परवानगी देण्यात आली होती, तर बाहेरील कोर्ट हिंदूंच्या वापरासाठी नियुक्त करण्यात आले होते. पुढे जानेवारी १८८५मध्ये महंत रघुबीर दास यांनी मशिदीच्या बाहेर असलेल्या रामचबुत्रावर छत बांधण्याची परवानगी फैजाबाद जिल्हा न्यायालयात मागितली, मात्र ही याचिका फेटाळण्यात आली. पुढे न्यायालयीन लढाई सुरूच राहिली. तत्पूर्वी १९८० साली प्रभू रामाचे जन्मस्थान मुक्त करण्यासाठी आणि त्यांच्या सन्मानार्थ मंदिर बांधण्याच्या उद्देशाने विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वाखालील समितीची स्थापना करण्यात आली. मग अयोध्या न्यायालयाने हिंदूंना प्रार्थना करण्यासाठी मशीद उघडण्याचे आदेश दिले. प्रत्युत्तर म्हणून मुस्लिमांनी बाबरी मशीद कृती समिती स्थापन केली. राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारने बाबरी मशिदीचे दरवाजे उघडण्याचे आदेश दिले. त्यामुळे १९८९मध्ये 'विहिंप'ने आणखी एक पाऊल पुढे टाकत बाबरी मशिदीला लागून असलेल्या जमिनीवर राम मंदिर बांधण्यास सुरुवात केली. यानंतर दुसऱ्या वर्षी विहिंपच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या राम मंदिर आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी भाजपने तत्कालीन अध्यक्ष लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली गुजरातमधील सोमनाथ ते अयोध्येपर्यंत राष्ट्रीय रथयात्रा काढली. ही रथयात्रा चांगलीच गाजली. संघ परिवारातील स्वयंसेवक, कारसेवकांचा यामध्ये मोठ्या संख्येने सहभाग होता. तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांच्या आदेशाने बिहारमध्ये अडवाणींना प्रतिबंधात्मक कोठडीत टाकले. त्यामुळे आंदोलक संतापले आणि त्याची परिणती वादग्रस्त बाबरी मशीद पाडण्यात झाली. यातून हिंसाचार सुरू झाला. २००२मध्ये गुजरातमधील गोध्रा येथेही दंगल उसळली. पुरातत्व खात्याने सर्वेक्षण केले. दरम्यान, न्यायालयीन प्रक्रियाही सुरू होती. अखेर २०१९मध्ये सर्वोच्च न्यायालयाने रामजन्मभूमी मंदिराच्या उभारणीसाठी भारत सरकारद्वारे स्थापन करण्यात येणारी २.७७ एकरची वादग्रस्त जमीन ट्रस्टकडे हस्तांतरित करण्याचा आदेश दिला. याशिवाय मशीद बांधण्यासाठी सुन्नी वक्फ बोर्डाला वेगळ्या ठिकाणी पर्यायी पाच एकर जागा देण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. ५ ऑगस्ट २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिराच्या बांधकामाची पायाभरणी केली आणि आज रामलल्लाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे.**

# गुलाबी थंडीत लज्जतदार पोपटीचा घमघमाट



**खबरबात**
**धम्मशील सावंत**

सध्या रायगडात वैशिष्ट्यपूर्ण व लज्जतदार पोपटीचा घमघमाट सुटला आहे. जिथे तिथे पोपटीचीच चर्चा व तयारी पहावयास मिळत आहे. थंडीच्या दिवसांत विदर्भात, खान्देशात ज्याप्रमाणे ज्वारी, बाजरीच्या कणसांना भाजून केलेला हुर्डा प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेच रायगड जिल्ह्यामध्ये गावठी वालाच्या शेंगांची वैशिष्ट्यपूर्ण व लज्जतदार पोपटी प्रसिद्ध आहे. सध्या गावठी वालाला सुगीचे दिवस आले आहेत. ठिकठिकाणी शेतावर या पोपटी पार्ट्यांची धूम पहावयास मिळते. फाईव्ह स्टार हॉटेलच्या पदार्थांपेक्षा कोकणी स्वादिष्ट पोपटी लयभारी, पोपटीची चव आणि बातच न्यारी असा सूर पोपटीप्रेमी, खवय्यांकडून ऐकावयास मिळत आहे. या वेळी गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाणघेवाणही होते.

वालाच्या शेंगा भांबुर्डीच्या पाल्यात मडक्यामध्ये मोकळ्या आगीवर विशिष्ट पद्धतीने शिजवल्या जातात. त्यामध्ये कांदा व बटाटा तसेच अंडी, चिकन घालून त्यांची लज्जत वाढविली जाते. यालाच पोपटी असे म्हणतात. सध्या जिल्ह्यात सर्वत्र पोपटी पार्ट्यांची धम्माल सुरू झाली आहे. जिल्ह्याच्या मातीत पिकविलेल्या चवदार टपोऱ्या दाण्याच्या गावठी शेंगांच्या पोपटीला अधिक पसंती आहे. येथील स्थानिक गावठी शेंगा आता येण्यास सुरुवात झाली आहे. गावठी शेंगा मुबलक नसल्याने पुण्यावरुन आलेल्या शेंगावरसुद्धा खवय्यांना सध्या समाधान मानावे लागत आहे. स्थानिक गावठी वालांच्या पोपटीतील वालाच्या शेंगा कितीही खाल्या तरी त्या पोटाला बाधत नाही हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. विदर्भात, खान्देशात ज्याप्रमाणे ज्वारी किंवा बाजरीच्या कणसांना भाजुन केलेला हुर्डा प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेच जिल्ह्यामध्ये गावठी वालाच्या शेंगांची पोपटी प्रसिद्ध आहे. ठिकठिकाणी शेतावर किंवा घराबाहेर मोकळ्या जागेत पोपटी पार्ट्यांची धम्माल पहायला मिळते. येथे काही ठिकाणी काव्यसंमेलन रंगतात तर गप्पा गोष्टींच्या मैफिलीमध्ये सुखदुःखाची देवाण घेवाणही होत आहे. अशातच निडीच्या गावठी शेंगांना पसंती मिळत आहे.

पोपटीसाठी अस्सल गावठी शेंगांनाच पसंती असते. गावठी शेंगांमुळेच खरी लज्जत व चव टिकून राहते. मुंबई-गोवा महामार्गावर नागोठण्याजवळील निडी गावातील शेंगा विशिष्ट गोड चव व टपोरे दाण्यांसाठी सर्वत्र प्रसिद्ध आहेत. निडीगावच्या परिसरातील जमिनीचा पोत कसदार असुन परंपरागत पद्धतीने जपवूणक करून ठेवलेले बियाण्याचाच वापर येथे केला जातो. हे बियाणे दुसरे कुठे नेऊन पिकविल्यास अशी दर्जेदार शेंग होत नाही. या वालाला विशिष्ट गोड चव, शेंगेचा आणि दाण्याचा आकारही मोठा. सुरुवातीस बांधावर आलेल्या शेंगाची चव तर अधिकच रुचकर. या शेंगांचा वाल संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.

### गावठी वालाला मागणी

खास करून पोपटी करण्यासाठी गावठी वालाच्या शेंगाना मागणी असते. जिल्ह्यात रब्बी हंगामात साधारण साडे पंधरा हजार हेक्टरवर कडधान्याचे पिक घेतले जाते. त्यामध्ये सर्वांत जास्त म्हणजे जवळपास चार हजार ३८१ हेक्टरवर वालाची लागवड केली जाते. वालाला सुरुवातीस दर चांगला मिळतो. किलोला १०० ते १२० रुपये नंतर शेंगा सर्वत्र येऊ लागल्यावर शेवटी दर ४० ते ५० रुपये किलोपर्यंत जातो. लागवड व मशागत करण्यासाठी मेहनत लागते. वातावरणाने साथ दिल्यास चांगले उत्पन्न मिळते. शेंगा सुकवून त्यापासून मिळालेल्या वालाची विक्रीदेखील केली जाते.

### भांबुर्डीच्या पाल्याचे विशेष

भांबुर्डीच्या पाल्याचे विषेश आहे. याला गोरखमुंडी, वसई-विरारमध्ये बोडथोला, काही ठिकाणी कोंबडा तर रायगड मध्ये भांबुर्डी किंवा भामरुड असे म्हणतात. पावसाळ्यानंतर हा पाला रस्त्याच्या कडेला माळराणात सर्वत्र उगवतो. या पाल्यात औषधी गुणधर्म असतात. जखम झाल्यास पालाच्याच रस जखमेवर चोळतात. पोपटीमध्ये हा पाला टाकल्याने पाणी नसतांनादेखील याच्या वाफेवर शेंगा चांगल्या शिजतात, तसेच वालच्या शेंगा पोटाला बाधत नाहीत आणि लज्जतदार चवदेखील येते हे याचे विषेश.

### पोपटी बनविण्याची विशिष्ठ पद्धत

पोपटी बनविण्यापूर्वी सर्व साहित्य जमवून ठेवणे आवश्यक. सर्व प्रथम मोठ्या मडक्यामध्ये तळाला भांबुर्डीचा पाल्याचा थर लावावा. भांबुर्डीचा पाला सगळीकडे मोठ्या प्रमाणात उगविलेला आहे. मग त्यावर टपोऱ्या वालाच्या शेंगाचा एक थर लावावा. त्यावर बटाटा व कांदे ठेवावेत, चिकन मांसाहारी असल्यास चिकन व अंडी ठेवावे. यावर जाडे मिठ व ओवा गरजेप्रमाणे पसरवावा. पुन्हा अशाच प्रकारे वालाच्या शेंगाचा टाकुन इतर साहित्याचा थर लावावा. मडके भरल्यानंतर त्याला निट हालवावे जेणे करुन आतील सर्व जिन्नस घट्ट बसेल. त्यानंतर मडक्याचे तोंड भामरुडीच्या पाल्याने घट्ट बंद करावे. तीन विटांवर अथवा दगडावर मडके उपडे करून ठेवावे. बाजूने पेंढा व लाकूड पेटवावेत. चांगली धग लागण्यासाठी मडक्यावर गोणपाट टाकावेत. मडक्याला सर्व बाजूने निट उष्मा मिळाल्यास साधारण अर्धा ते पाऊण तासामध्ये आतील सामर्गी निट शिजते. पोपटी निट शिजली आहे की, नाही हे पाहण्यासाठी मडक्यावर बारीक दडट मारतात. त्या वेळी विशिष्ट आवाज आल्यास पोपटी शिजली असे समजले जाते, तसेच काही जण पाण्याचे दोन तीन थेंब मडक्यावर टाकतात ते थेंब लगेच गायब झाल्यास पोपटी शिजली असे समजावे. मग मडके हळूच गोणपाटाने उचलून एका चादरीवर अथवा गोणपाटावर उपडे करावे आणि आतील सामर्गी त्यावर काढून ताबडतोब ते गुंडाळवावे याला दडपवणे असे म्हणतात. ज्यामुळे वाफ लगेच निघून जात नाही शेंगा करपत नाहीत आणि चव तशीच राहते. आता गरमागरम लज्जतदर शेंगा, कांदा, बटाटा, अंडी आणि चिकनची मजा लुटण्यासाठी तुटून पडा!

### मडके नाही मग पत्र्याच्या डब्यातही करा पोपटी

पोपटीसाठी मडक्यांनादेखील खूप मागणी असते. मडके उपलब्ध नसल्यास त्याऐवजी तेलाच्या पत्र्याच्या डब्यामध्येही पोपटी केली जाते. यासाठी पत्र्याच्या डब्याचे तोंड तीन बाजूने कापलेले असते. अगदी मडक्यात लावतात त्याप्रमाणे कृती करून पत्र्याचे झाकन घट्ट लावावे व आगीवर उपडे ठेवावे. काही वेळेला मडके फुटते किंवा त्याला तडा जातो आणि आतील साहित्य करपते किंवा अर्धवट शिजते, मात्र पत्याच्या डब्यामध्ये ही भिती नसते आणि तो वारंवार वापरतादेखील येतो.



## बदलते तंत्रज्ञान

### ॲमेझॉन ग्रेट रिपब्लिक सेलमध्ये आकर्षक ऑफर्स

नवीन वर्षाच्या सुरुवातीला मेझॉनने आपल्या नवीन सेलची घोषणा केली आहे. मेझॉनच्या नवीन सेलचे नाव ॲमेझॉन ग्रेट इंडियन रिपब्लिक डे सेल असे आहे. या सेलदरम्यान मेझॉनकडून अनेक वस्तूंवर ऑफर देण्यात आल्या आहे. हा सेल १३ जानेवारीपासून सुरू झाला आहे. कंपनी ग्राहकांना लहान उपकरणांवरदेखील ५९ टक्क्यांपर्यंत सूट देत आहे. स्वयंपाकघरातील काही खास गोष्टी तुम्ही या सेलमध्ये खरेदी करू शकणार आहात.




एस्टीम मल्टी किटली : सेलमध्ये तुम्हाला ही मल्टी टास्किंग किटली १३०४ रुपयांना मिळेल. ही किटली १.२ लिटरची असून त्यात तीन हीटिंग मोड आणि ६०० वॉट्स आहेत. त्यामध्ये तुम्ही दूध, चहा, पाणी आदी तीन हीटिंग मोडच्या साह्याने सोईनुसार उकळवू शकता.


**इलेक्ट्रिक चॉपर :** अनेकदा कांदा किंवा भाजी चिरून घ्यायची असेल, तर विळी किंवा सुरीचा वापर करण्यात येतो आणि हे काम अनेकांना कंटाळवाणे वाटते. ही बाब लक्षात घेता कंपनीने या सेलमध्ये त्यांचे इलेक्ट्रिक चॉपर सादर केले आहे, ज्यात ४०० वॉट्सचे पॉवरहाऊस आहे. हे उपकरण स्वयंपाकघरात भाजी, कांदा चिरून देण्यास किंवा फळे कापण्यासाठी तुम्हाला उपयोगी पडेल. सेलमध्ये याची किंमत १४९९ रुपये इतकी आहे.

**इम्पेरियल इलेक्ट्रिक कूकर :** इम्पीरियल इलेक्ट्रिक प्रेशर कूकर कमी वेळेत झटपट जेवण बनवण्यास मदत करील, जो तुम्हाला या सेलमध्ये ७,९९९ रुपयांना उपलब्ध आहे. हा कूकर सहा लिटरचा आहे तसेच तुम्ही यात जेवणाचे अनेक पदार्थ सहज बनवू शकता.

**बोरोसिलिकेट एलईडी ग्लास मिक्सिंग बाउल :** सेलमध्ये याची किंमत फक्त ९७५ रुपये इतकी आहे. हे बाउल तुम्हाला लहान, मध्यम व मोठा अशा तीन आकारांत मिळतील. त्यात तुम्ही तयार केलेले अनेक पदार्थ ठेवू शकता.

**ग्रो क्रेस्ट पोर्टेबल स्पॉट क्लीनर :** क्रेस्ट पोर्टेबल स्पॉट क्लीनर खास स्वच्छतेसाठी डिझाइन करण्यात आले आहे. फरशी अस्वच्छ असेल किंवा कार्पेटवर एखादा डाग असेल, तर तुम्ही तो पोर्टेबल स्पॉट क्लीनरच्या मदतीने काही मिनिटांत साफ करू शकता. हे क्लीनर हलके असून घर स्वच्छ करण्यासाठी उपयोगी आहे, जे या सेलमध्ये ६,९९९ रुपयांना मिळेल.

# शिक्षणतज्ज्ञ स्वामी रामानंद तीर्थ



**निमित्त**

स्वामी रामानंद तीर्थ यांचा आज स्मृतिदिन. ते स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर नेते, शिक्षणतज्ज्ञ, विद्वान व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव व्यंकटेश भगवान खेडगीकर होते. त्यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९०३ रोजी कर्नाटकातील सिंदगी येथे कर्मठ ब्राह्मण कुटुंबात झाला. वडील भगवानराव प्राथमिक शाळेत शिक्षक होते. रामानंदांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी झाले. त्यांनी एका राष्ट्रीय विद्यालयातून मॅट्रिकची परीक्षा दिली आणि पुढे अमळनेर व पुणे येथील महाराष्ट्र विद्यापीठातून इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांसह बीए व एमए पदवी संपादन केली. त्यानंतर १९२६मध्ये ना. म. जोशी यांच्या स्वीय सहाय्यकपदी ते रुजू झाले.

रामानंद तीर्थ गिरणी कामगारांच्या लढ्यात ते सक्रिय सहभागी झाले. ना. म. जोशींनी स्वामीजींना कामगारविषयक विधेयकाची माहिती घेण्यासाठी ऐन हिवाळ्यात दिल्लीला पाठविले. नंतर त्यांनी अध्यात्माची कास धरली. आपल्या जन्मनावाचा त्याग करून भिक्षुकी अंगीकारली. त्यानंतर हिप्परगा (ता. लोहारा, जि. उस्मानाबाद) येथे लखनौस्थित स्वामी नारायण यांच्याकडून संन्यासदीक्षा घेऊन ते स्वामी रामानंद तीर्थ झाले. त्यांनी हिप्परगा येथे १९३०मध्ये राष्ट्रीय विचारांच्या प्रचारार्थ शिक्षण संस्था काढली. सहा-सात वर्षे राष्ट्रीय बाण्याने हे कार्य केल्यानंतर ते १९३५मध्ये सक्रिय राजकारणात सहभागी झाले आणि याच सुमारास आंबेजोगाई येथे योगेश्वरी नूतन विद्यालयात शिक्षकाची नोकरी धरली. पुढे ते मुख्याध्यापकही झाले.


नंतर स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेड येथे १९५०मध्ये नांदेड एज्युकेशन संस्थेची स्थापना केली आणि नांदेड शहरात पीपल्स कॉलेज काढले. त्यानंतर त्यांनी १९५२च्या सार्वत्रिक निवडणुकांत गुलबर्गा मतदारसंघातून निवडणूक लढवून संसदेत प्रवेश केला.

हैदराबादचे विभाजन करून संयुक्त महाराष्ट्र, विशाल आंध्र व संयुक्त कर्नाटक अशी राज्ये निर्माण करावीत, अशी स्वामीजींची धारणा होती. पं. जवाहरलाल नेहरूंचा हैदराबादच्या विभाजनाला विरोध होता. दरबनी संस्कृतीच्या एक मिश्र भाषिक राज्याचा प्रयोग या दृष्टीने ते हैदराबादकडे पाहत होते. अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन १९५३मध्ये हैदराबादला झाले. स्वामी रामानंद तीर्थ हे स्वागताध्यक्ष होते. स्वामीजींनी आपल्या भाषणामध्ये हैदराबादच्या विभाजनाचा प्रश्न मांडू नये, असे पं. नेहरूंना वाटत होते, पण स्वामीजींनी तोच प्रश्न मोठ्या आग्रहाने मांडला. पं. नेहरू नाराज झाले व प्रथा सोडून स्वामीजींना कार्यकारिणीमध्येसुद्धा घेतले नाही. स्वामीजींनी हा मुद्दा मांडला नसता तर कदाचित ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष झाले असते. मानमरातबाच्या दृष्टीने पं. नेहरूंची मर्जी सांभाळणे महत्त्वाचे होते, परंतु स्वामीजींनी जनतेची इच्छा प्रमाण मानली.

हैदराबादचे विभाजन झाले नसते तर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येऊच शकला नसता याकडे दुर्लक्ष होते याची खंत वाटते. स्वामी रामानंद तीर्थ यांना शिक्षणाविषयी विलक्षण तळमळ होती. हिप्परग्याच्या संस्थेमध्ये व नंतर अंबाजोगाईच्या शिक्षण संस्थेमध्ये कार्य करत असताना स्वातंत्र्यप्राप्तीच्या आकांक्षेने प्रेरित झालेली युवकांची फौज तयार करण्याचे त्यांचे ध्येय होते, तर नांदेडला पीपल्स कॉलेज काढताना स्वामी रामानंद तीर्थ यांची दृष्टी नवभारताच्या उभारणीसाठी नवी पिढी तयार करण्याची होती. अशा या महनीय व्यक्तीचा २२ जानेवारी १९७२ रोजी मृत्यू झाला. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**





**मुरूड : येथे छत्रपती शिवरायांनी उभा केलेल्या पद्मदुर्गाला आता नवा साज चढणार आहे. त्यामुळे शिवप्रेमींमध्ये समाधान व्यक्त केले आहे.**

## आरोग्य प्रहर

### जास्त वेळ बसून राहण्याचे आरोग्यावर दुष्परिणाम

सध्या धावपळीच्या आयुष्यात आपण आरोग्याकडे लक्ष देत नाही. जास्त वेळ एकाच ठिकाणी बसून काम करणे आणि सोशल मीडियावर सर्वाधिक वेळ घालवणे जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनलाय. अपुरी झोप, पोषक आहार न घेणे, जंक फूड खायला खूप आवडणे, सतत तणाव जाणवणे आणि व्यायामाची सवय नसणे इत्यादी गोष्टींमुळे आपण निरोगी जीवन जगू शकत नाही, पण नियमित २० मिनिटे चालण्यामुळे तुम्हाला फरक जाणवू शकतो. या विषयी 'होलिस्टिक हेल्थ'तज्ज्ञ डॉ. मिकी मेहता यांनी माहिती दिली.



पाच ते दहा मिनिटे व्यायाम केल्यामुळे शरीरातील असंतुलन सुधारण्यास मदत होते. याशिवाय शरीराला भरपूर ऑक्सिजन मिळते आणि सर्व अवयवांचे कार्य सुधारण्यास मदत होते. एकाग्रता, सहनशक्ती, लवचिकता, स्टॅमिना वाढतो. खालील व्यायामाचे प्रकार सोमवार ते शुक्रवार असे पाच दिवस करावेत.

**जम्पिंग जॅक कॉम्बो** : सुरुवातीला तीन मिनिटे साधा वॉर्मअप व्यायाम करावा, ज्यामध्ये मानेची हालचाल, हात आणि खांदे फिरवणे, पाय हलवणे, समोर-मागे, आजू-बाजूला वाकणे इत्यादी प्रकारचा व्यायाम करावा. जम्पिंग जॅक हा मुळात हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम व्यायाम आहे.

**दोरी उड्या मारणे** : या व्यायामामुळे तुमच्या हृदयाचे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत होते. यात जास्तीत जास्त कॅलरी वापरल्या जातात आणि चयापचय क्रिया सुधारतात.

**बॉडीवेट स्क्वॅट्स** : सर्वांत आधी सरळ उभे राहा आणि तुमचे पाय आणि खांदे सरळ ठेवा. त्यानंतर पाठ ताठ करून खुर्चीवर बसतात तसे मागच्या बाजूला बसा. एका मिनिट असेच राहा.

**गुडघे वर उचला** : जेव्हा तुम्ही जागेवर धावता तेव्हा तुमचे गुडघे वर उचलून छातीच्या दिशेने आणा. हा व्यायाम एक मिनिटासाठी करा. या व्यायामामुळे कॅलरी जास्त वापरले जातात आणि हृदयाचे स्नायू बदलतात.

**लंज** : हा व्यायाम करताना ताठ उभे राहावे. उजवा पाय पुढे टाकावा आणि डावा पाय गुडघ्यातून दुमडून जमिनीच्या दिशेने खाली वाकवा. त्यानंतर डावा पाय पुढे टाकावा आणि उजवा पाय गुडघ्यातून दुमडून जमिनीच्या दिशेने खाली वाकवा.

**बर्पी** : छाती, हात, पाय आणि स्नायूच्या आरोग्यासाठी हा व्यायाम फायदेशीर आहे. सुरुवातीला स्क्वॅट्स स्थितीत उभे राहा. त्यानंतर दोन्ही पायांमध्ये अंतर ठेवा. कंबर ताठ असायला हवी. दोन्ही हात जमिनीवर खाली टेकवा, नंतर पाय मागे घेऊन जा आणि पुश अपच्या स्थितीत या. एकदा पुश अप करा, नंतर पुन्हा स्क्वॅट स्थितीत या. हात वर करून उंच उडी मारा.

# मार्च अखेर साळाव-मुरुड रस्त्याचे काम पूर्ण होणार -आमदार महेंद्र दळवी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नागरिकांची मागणी होती की, साळाव मुरुड रस्त्याचे काम लवकरात लवकर व्हावे अशी मागणी होती. या मागणीचा पाठपुरावा करताना बजेटमधून विशेष ३० कोटी रुपयांची तरतूद करून आणली आहे. या रस्त्याचा पहिला टप्पा बोर्ली ते साळाव सुरू झाला आहे. मार्च अखेरपर्यंत हा संपूर्ण रस्ता पूर्णपणे तयार झालेला असेल, असा विश्वास अलिबाग-मुरुड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला आहे.



या वेळी या पत्रकार परिषदेत शिवसेनेचे जिल्हा उप प्रमुख भरत बेलोसे, माजी नायब तहसीलदार दीपक आंबुकर, माजी सर्कल अधिकारी अशोक पाटील, मुरूड शहर अध्यक्ष संदीप पाटील,माजी नगरसेवक महेश भगत, महेश पाटील, भंडारी बोर्डिंगचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, आदी सर्व शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

साळाव-मुरुड रस्त्यामधील काही भाग हा रेवस रेड्डीला जोडला जाणार आहे. त्याचप्रमाणे जुना रस्तासुद्धा आता नवीन होत आहे. साळाव मुरूड रस्त्याचे एकूण दहा टप्पे असून सदरचे काम आशिष आयंस्पुन कंपनीला हे काम एक मार्गी देण्यात आले आहे. सदरचा रस्ता लवकरात लवकर पूर्ण करून देण्याचे संबंधित ठेकेदारास सांगण्यात आले आहे. येत्या बजेट मधून आंबोली धरणातील कालव्यांसाठी पैसे आणण्याचा प्रयत्न असणार आहे.

मुरूड तालुक्याला क्रीडा संकुल होण्यासाठी अलिबाग व मुरूड तालुक्यासाठी १० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे.

आता येथे फक्त पाच एकर जागेची आवश्यकता असून सदरचे क्रीडा संकुल कार्यान्वित होणार आहे. मुरूड तालुक्यातील २४ ग्रामपंचायती मध्ये विविध विकास कामे होण्यासाठी डीपीआर तयार करण्यात येणार आहे. ज्या ग्रामपंचायतीना विकास कामे आवश्यक असतील तर डीपीआर असल्याने विकास कामांना गती मिळणार आहे. येणाऱ्या सहा महिन्यात जास्तीत जास्त विकास कामे ग्रामपंचायतीमध्ये राबवणार असल्याचे या वेळी आमदार दळवी यांनी सांगितले.

## आंबा उत्पादनामध्ये आदर्श कृषी प्रणाली अवलंबण्याचे आवाहन

**म्हसळा : प्रतिनिधी**

सहकार पणन विभाग, आशिया विकास बँक अर्थसहित महाराष्ट्र ग्री बिझनेस (मॅग्नेट) प्रकल्प कृषी विभाग रायगड व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय, म्हसळा येथे एक दिवसीय आंबा उत्तम कृषी पद्धती याबाबत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेत २३७ आंबा उत्पादक बागायतदारांनी कार्यशाळेचा फायदा घेतला. कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादीत होणाऱ्या आंबा पिकाला अधिक दर्जेदार उत्पादन कसे घेता येईल, कीड रोग व विषमुक्त आंबा कसा निर्माण होईल या दृष्टीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मॅग्नेट प्रकल्प अंतर्गत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या उद्घाटनावेळी उपविभागीय कृषी अधिकारी महाड जितेंद्र रणवरे यांनी कोकणमध्ये उत्पादित होत असलेल्या आंबा आणि काळाची मागणी लक्षात घेता अधिकाधिक दर्जेदार उत्पन्न कसे घेता येईल त्या दृष्टीने पिकाचे लागवडीपासून काढणीपर्यंत उत्तम नियोजन करण्याचे आवाहन केले.

या वेळी या कार्यक्रमाचे संयोजक महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे विभागप्रमुख दिगंबर साबळे यांनी देशात आणि परदेशांत हापूस आंबा हा एक अत्यंत दर्जेदार आंबा म्हणून नावाजला गेलेला आहे. स्थानिक आंबा उत्पादकांनी तंत्रशुद्ध फवारणी दर्जेदार पॅकिंग आणि त्याची टिकवण क्षमता ह्या बाबी लक्षात घेता स्थानिक कोकणातील बागायतदारांनी निर्यातीकडे कल वळविला आहे. बागायतदारांनी भविष्यांत केशर किंवा बैंगन पल्ली लागवड करणे अभ्यास करावा, असे सांगितले.



या वेळी रमेश चौगुले (कृषी विभाग, पनवेल) यांनी आंब्याची छाटणी आणि त्यांना द्यावयाचे पाणी यासंदर्भात सखोल मार्गदर्शन केलं घन लागवड ही शेतकऱ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आणि फायदेशीर आहे, असा यावेळेस त्यांनी आपला अनुभव सांगितला. परंपरागत पद्धतीने झाडांची संख्या आणि घन लागवडीमध्ये येणाऱ्या झाडांची संख्या यामध्ये मोठी तफावत असल्याकारणाने अधिक झाडांची लागवड झाल्यास नक्कीच उत्पादनात फरक पडतो, असे मत व्यक्त केले.

कृषी विज्ञान केंद्र रोहा येथील कीटक शास्त्रज्ञ जीवन आरेकर यांनी परकीय बाजारपेठेत आंबा निर्यात करताना किंवा देशांतर्गत सुद्धा आंबा विक्रीताना त्यामध्ये कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव असल्यास मोठी समस्या निर्माण होतात त्यामुळे आंब्याचा मोहोर येण्यापासून तर काढणीपर्यंत कीड व रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन आणि लेबल याचा वापर या संदर्भात माहीती दिली.

जिल्हा कृषी अधिक्षक उज्वला बाणखेले यांच्या मार्गदर्शना खाली आणि स्थानिक पातळीवरील आधिकारी कर्मचाऱ्यांचे सहकार्याने कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन झाले होते. तर तालुक्यांतील आबा बागायतदार कार्यक्रमाला उपस्थित राहिल्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाल्याचे तालुका कृषी आधिकारी राजेंद्र ढंगारे यांनी आभार मानताना सांगितले.

## कर्जत भाजप युवा मोर्चाच्या संयोजकपदी प्रसाद पाटील यांची नियुक्ती

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महड येथील भाजपचे युवा नेते प्रसाद रामजी पाटील यांची कर्जत - खालापूर विधानसभा संयोजकपदी नियुक्ती करण्यात आल्याने प्रसाद पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



खालापूर तालुक्यातील भाजपचे सक्रिय कार्यकर्ते तसेच सर्व सामान्य जनता व कामगारांसाठी झटणारे महड गावातील भाजपचे युवानेते प्रसाद रामजी पाटील यांची कर्जत - खालापूर विधानसभा संयोजक पदी भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी नियुक्ती केली असून आपल्या संघटन कौशल्याने आपल्या विभागात भारतीय जनता पक्ष कामगार मोर्चाचे संघटन वाढवून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी घोषणा पत्रकाद्वारे घोषित करण्यात आली.

प्रसाद पाटील आपले मत व्यक्त करताना म्हणाले की, लोकसभा व विधानसभा निवडणुकीबरोबर अन्य सर्वच निवडणुकीमध्ये प्रयत्नांची पराकाष्ठा करत पक्ष वाढीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करून पक्षाच्या माध्यमातून सामान्याचे प्रश्न मार्गी लावेल, असे मत नवनिर्वाचीत कर्जत - खालापूर विधानसभा संयोजक प्रसाद रामजी पाटील यांनी व्यक्त केले.

## खोपोलीत आज विविध कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

अयोध्या येथे श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा महोत्सव मोठ्या दिमाखात होणार आहे. हा महोत्सव अयोध्यासह संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. त्यासाठी सर्वत्र जोरदार तयारी करण्यात आली आहे. खोपोली शहर ही राम मय बनले असून खोपोली बाजारपेठेत संपूर्ण भगव्या पताका लावण्यात आले आहेत, सोमवारी दिवाळी हुन अधिक जल्लोषात श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा महोत्सव साजरा होणार आहे.



छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात, श्री हनुमान मंदिर, श्री विठ्ठल मंदिर, श्री राम मंदिर अशा सर्व ठिकाणी उत्सवाची जयत तयारी करण्यात आली आहे. यात शहरातील सर्व धर्मीय, सर्व राजकीय पक्षांचे लोक सहभागी होणार आहेत. नगर पालिकेकडून या महोत्सवा निमित्ताने शहरातील सर्व प्रमुख मंदिरे व परिसराची स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच या निमित्ताने स्वच्छता रॅली ही काढण्यात येणार आहे. सोमवारी शहरातील घरांवर, रहिवासी सोसायट्यांवर गुढी उभारून श्रीराम प्राणप्रतिष्ठाचा आनंद महोत्सव साजरा होणार आहे.

## तासगाव राजिप शाळेत शैक्षणिक साहित्य

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या चॅरिझन फाउंडेशन या सेवाभावी संस्थेतर्फे माणगाव तालुक्यातील राजिप शाळा तासगांव या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांना उपयोगी असे शालेय साहित्य वाटप करण्यात आले.



कार्यक्रमास भागाड ग्रामपंचायतीचे सदस्य जतिन रमेश महाडीक, दीपक महाळुंगे, ज्ञानेश्वर उतेकर, समीर जंगम, चॅरिझन फाउंडेशनचे कॅप्टन डॉ. रंधावा, अनिल मोकाशी, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. खांबे, शिक्षक वर्ग आदी उपस्थित होते. या वेळी समीर जंगम यांनी फाउंडेशनच्या ध्येय, धोरणांची माहिती उपस्थित सर्वांना दिली तसेच सदस्य जतिन महाडिक यांनी आभार मानून फाउंडेशनला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## माणगाव काजल डान्स अकॅडमीचा वार्षिक स्नेहसंमेलन



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात प्रसिद्ध असणाऱ्या काजल डान्स अकॅडमीचा वार्षिक स्नेहसंमेलन (२०२३-२४) शनिवारी (दि. २०) अशोकदादा साबळे विद्यालय, कचेरी रोड माणगाव येथील कै. चंद्रकांत वेलजी मेथा रंगमंचावर उत्साहात झाला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी अकॅडमीच्या संस्थापिका तथा डान्स शिक्षक काजल पाखुर्डे, वडील अजित पाखुर्डे व आई कल्पना पाखुर्डे यांचे विशेष कौतुक केले. स्नेहसंमेलनास उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे काजल डान्स अकॅडमीतर्फे काजल पाखुर्डे, कल्पना पाखुर्डे, अजित पाखुर्डे व पाखुर्डे कुटुंबीय व मित्र परिवार यांनी स्वागत केले.

या स्नेहसंमेलन कार्यक्रमाच्या सुरुवातीस माणगावचे लोकनेते तथा माजी आमदार स्व. अशोकदादा साबळे यांच्या स्मृती स्मारकास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाल्यावर मान्यवरांचे काजल डान्स अकॅडमीतर्फे स्वागत करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी काजल डान्स अकॅडमीला भरभरून शुभेच्छा दिल्या.

या स्नेहसंमेलन कार्यक्रमास माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अँड. राजीव साबळे, सामाजिक कार्यकर्ते संजयआण्णा साबळे, उद्योजक रामनारायण मिश्रा, जेष्ठ नेते काशीराम पाखुर्डे, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, नगरसेवक अजित तारळेकर, नगरसेविका शर्मिला सुर्वे, नगरसेविका रिया उभारे, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, खरवली ग्रामपंचायत सरपंच संतोष खडतर, शिक्षिका अपूर्वा जंगम, अँड. पुंडलिक मालोरे, अँड. योगेश आंबेतकर, प्रसिद्ध उद्योजक विरेश येरुणकर, हिरु शिर्के, स्वाती जाधव, स्मिता बोंबले, नामदेव हळदे, मंगेश साळुंके, सुनील खराडे आदी मान्यवरांसह पालकवर्ग, रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिरवळ महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट, कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, महाड, हिरवळ रात्र महाविद्यालय, महाड मधील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, युवा अस्मिता फाउंडेशन, महाड, जनकल्याण रक्त केंद्र महाड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात मंगळवारी (दि. १६) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या शिबिराला हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्रा. सुदेश कदम, उपप्राचार्य राकेश वडवलकर, युवा अस्मिता फाउंडेशन अध्यक्ष कुणाल चव्हाण, जनकल्याण रक्त केंद्राचे संचालक महेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्त पतपेढीतील भ्रांती खोपकर आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, प्रा.सुदेश कदम, उपप्राचार्य राकेश वडवलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

रक्तदान करण्यासाठी महाविद्यालयीन युवक - युवती, त्यांचे पालक, मित्रपरिवार आणि युवा अस्मिता फाउंडेशनमार्फत अनेक रक्तदात्यानी सहभाग नोंदवून २७ जणांचे रक्त संकलन करण्यात आले. हे शिबिर रक्त पेढ्यामधील मागणी आणि पुरवठा यातील तफावत कमी करण्यासाठी आयोजित केले होते. रक्त संकलनाची प्रक्रिया सुरळीत आणि कार्यक्षमतेने व्हावी यासाठी महाविद्यालयातील डीएलएलइ विद्यार्थी व एनएसएस विद्यार्थी, युवा अस्मिता फाउंडेशन चे स्वयंसेवक यांच्या टीमने संपूर्ण कार्यक्रम काळजीपूर्वक आयोजित करून अंमलात आणला.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया व संचालिका सोनाली धारिया यांनी स्तुत्य उपक्रम आयोजित केल्यामुळे महाविद्यालयाचे आभार व्यक्त केले व रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असा सामाजिक संदेश दिला. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी या शिबिरात सहभागी शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे, सहभागी व्यक्तींचे कौतुक केले. या उपक्रमामुळे परोपकराची व सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण झाली. या शिबिराला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## 'पदमदुर्गवर जेट्टी झाल्यास रोजगाराला सुरुवात'

**मुरूड : प्रतिनिधी**

पद्मदुर्ग किल्ला येथे गेले अनेक वर्षे जेट्टी ची आवश्यकता होती परंतु ती पूर्ण होत नसल्याने पर्यटक व स्थानिक नागरिकांना या किल्ल्यावर जाता येत नव्हते, परंतु लोकांची ही मागणी खासदार सुनील तटकरे व स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी ओळखून प्रत्यक्ष विविध अधिकारी वर्गासह भेट देऊन जेट्टीची पूर्तता करण्याचे आदेश दिल्याने लवकरच ही जेट्टी होणार असून स्थानिक लोकांच्या रोजगारात वाढ होऊन आर्थिक सुबत्ता वाढण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन पदमदुर्ग व्यवसायिक मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी केले आहे.

नुकतीच खासदार व आमदार यांनी पदमदुर्ग किल्ल्याला भेट देऊन किल्ल्याची दुरुस्ती व जेट्टी च्या निर्मितीचे आदेश दिले होते. यावर आपली भूमिका मांडताना गायकर पत्रकारांशी बोलत होते. सध्या राजपुरी येथील एकच जंजिरा किल्ला पर्यटकांना पहावयास मिळतो, परंतु पदमदुर्ग किल्ल्यावर जेट्टी ची निर्मिती झाल्यावर पर्यटकांचा ओघ येथे सुद्धा वाढणार आहे. त्यामुळे स्थानिक लोकांच्या होड्या तसेच विविध स्टॉल यांची निर्मिती होऊन स्थानिकांना रोजगार मिळून चार पैसे कमवता येणार आहेत.

पदमदुर्ग किल्ल्यावर जेट्टी व्हावी यासाठी आमच्या संघटनेकडून सुद्धा महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी याना पत्रव्यव्हारसुद्धा करण्यात आल्याची माहिती या वेळी गायकर यांनी दिली.

## बाळासाहेब ठाकरेंच्या जयंतनिमित्त आरोग्य शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य राखून आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन व रोटरी क्लब मुंबई सिकोस्ट आयोजित महा आरोग्य शिबिर झाले. या वेळी विविध आजारांवर सुमारे दोन हजार जणांवर उपचार करण्यात आले.

पोसरी येथील शिवतीर्थ सभागृहामध्ये आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन व रोटरी क्लब मुंबई सिकोस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने महा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी आमदार महेंद्र थोरवे, किशोर मसुरकर, अंकुश जैन, उप जिल्हा प्रमुख भाई गायकर, शिवराम बदे, नगरसेवक संकेत भासे आदी उपस्थित होते.

या वेळी व्हीलचेअर, शिलाई मशीनचे वाटपदेखील मान्यवरांच्या हस्ते झाले. या शिबिरातमोफत नेत्र तपासणी, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया ई.सी.जी. रक्तदाब, मधुमेह, हाडांचे आजार, पाठदुखी, मानदुखी, हात आणि पायाच्या मुंग्या, कर्करोग, स्त्रीरोग, दंत चिकित्सा आदींवर मोफत उपचार करण्यात आले. तसेच चष्मा, सॅनिटरी पॅड्स, औषधे यांचे मोफत वाटपदेखील झाले. या शिबिरात दोन हजारांपेक्षा जास्त जणांची तपासणी झाली.



## मोरे महिला महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागाची क्षेत्रभेट

**रोहे : प्रतिनिधी**


एम. बी. मोरे फाउंडेशन संचलित महिला महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभाग आणि सर्टिफिकेट कोर्स समितीने संयुक्तरित्या गुरुवारी (दि. १७) कृषिविज्ञान केंद्र, किल्ला येथे क्षेत्रभेटीचे आयोजन केले होते.

या क्षेत्रभेटीत कृषिविज्ञान केंद्र कर्मचारी श्री सचिन कार्ले यांनी ग्राफ्टिंग, फलोत्पादनाचे विविध प्रकार, कलम बनविणे, शेळी पालन, नारळ, आंबा व सूर्यफूल यांच्या नर्सरी इ. बाबत माहिती दिली. डॉ. जीवन आरेकर यांनी पीक संवर्धन व मत्स्य उत्पादनाची माहिती दिली. डॉ. सुधाकर पाध्ये यांनी बागकामातील विविध अवजारे, भात लावणी यंत्र व भात कापणी यंत्र यांबद्दल विद्यार्थिनींना माहिती दिली.

वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्रा. योगिता नेहते व द्वितीय वर्ष वर्गातील ३९ विद्यार्थिनींनी क्षेत्रभेटीत सहभाग घेतला होता. महिला महाविद्यालयाच्या सर्टिफिकेट कोर्स समितीच्या प्रा. अक्षता ठाकूर यांनी या क्षेत्रभेटीचे नियोजन केले.




॥ श्री ॥
सदगुरु ज्योतिष (पनवेल)




कॉम्प्युटराईअ, जन्मकुंडली बनवून मिळेल
शुभ कार्यासाठी पंचाग मुहुर्त, विवाह गुणमेलन
वैयक्तिक समस्यांसाठी कुंडलीद्वारे सल्ला मार्गदर्शन
ओरीजनल नवग्रह रत्न । उपरत्न मिळतील'
**संपर्क :- सदगुरु ज्योतिष १६०सुमित्रा सदन, शॉप ने १ केतकी हॉटेल समोर, शिवाजी रोड पनवेल जि. रायगड.**
**मो. नं.९७०२९३५३२८/९०२९८५०५८०**

# अटल सेतूवर पोलिसांनी गस्त वाढवली

**उरण : रामप्रहर वृत्त**

मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या अटल सागरी सेतूवर न्हावा शेवा वाहतूक पोलिसांनी आठवडाभरात ६५० बेशिस्त वाहनांवर कारवाई केली. यामध्ये सात लाखांपेक्षा अधिक रकमेचा दंड वसूल करण्यात आला आहे. आठवडाअखेरीस शनिवार, रविवारी या सेतूवर वाहन संख्या वाढण्याची शक्यता असल्याने वाहतूक पोलिसांनी गस्त वाढविण्यासाठी नियोजन केले आहे.

अटल सेतूपैकी १०.४ ते १९.६ किलोमीटरचा मार्ग न्हावा शेवा वाहतूक पोलीस हद्दीत येत आहे. त्याच्या सुरक्षेची जबाबदारी या ठाण्याकडे आहे. गव्हाण, शेलघर टोलनाका / शिवाजीनगर टोल यांचाही समावेश आहे. उद्घाटनानंतर सेतूवरच सेल्फी काढण्यासाठी वाहने थांबवून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनचालकांवर न्हावा-शेवा वाहतूक नियंत्रण पोलीस शाखेने दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. सेतूवरून प्रवास करताना नियमबाह्य वर्तन करणाऱ्यांविरुद्ध आणखी कठोर कारवाई सुरू केली आहे.



## ६५० बेशिस्त वाहनांवर कारवाई

सेतूवर चारचाकी वाहनांसाठी वेग-मर्यादा १०० किलोमीटर प्रति तास ठेवण्यात आली आहे. तसेच या पुलावर विनाकारण थांबण्यास आणि वाहन उभी करण्यास मनाई करण्यात आली आहे, मात्र अनेक वाहन चालक वाहने सेतूवर उभी करून वाहनातून खाली उतरून सेल्फी काढतात. या गंभीर प्रकारामुळे भविष्यात एखादा गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, असे न्हावा शेवा वाहतूक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम. मुजावर यांनी सांगितले.

### १५०० रुपयांपर्यंत दंड

अटल सेतूवर बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध मोटर वाहन कायद्याप्रमाणे प्रत्येकी ५०० ते १५०० रुपये रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. त्यासाठी दोन पथके दिवस-रात्र कार्यरत आहेत. या पथकातील पोलिसांवर मनुष्यबळ कमी असल्याने ताण पडत आहे. त्यासाठी १०० वॉर्डनची, वाहतूक पोलिसांसाठी निवारा शेड तसेच गस्तीसाठी दोन वाहनांची मागणी करण्यात आली असल्याची माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.

## वाशी खाडी पुलावर काम करताना खाडीत पडून मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**



वाशी खाडीवर उभारण्यात येत असलेल्या नवीन पुलावर वेल्डिंगचे काम करणारा तरुण सेफ्टी बेल्ट अडकवलेल्या लोखंडी प्लेटसह घसरून खाडीमध्ये पडल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली. अमन सहानी (वय २४) असे या तरुणाचे नाव असून, वाशी पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करून या प्रकरणाच्या पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

या दुर्घटनेत मृत झालेला अमन सहानी हा तरुण मूळचा उत्तर प्रदेश राज्यातील असून, सध्या तो मानखुर्द येथील महाराष्ट्र नगरमध्ये कामगारांसाठी असलेल्या घरामध्ये राहण्यास होता. तसेच तो वाशी खाडी पुलावर एल ण्ड टी कंपनीच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या नवीन पुलावर काम करत होता. शुक्रवारी दुपारी अमन हा नवीन खाडी पुलावर वेल्डिंगचे काम करत होता. यावेळी अमनने ज्या लोखंडी फ्लेटला सेफ्टी बेल्ट अडकवला होता, त्या लोखंडी फ्लेटसह तो घसरून खाडीमध्ये पडला. या वेळी इतर कामगारांच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर त्यांनी तत्काळ खाडीमध्ये उडी टाकून त्याला बाहेर काढले.

## अडथळे नवीन गोष्टी शिकवतात
### कवयित्री प्रतिभा सराफ यांचे प्रतिपादन

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात माध्यमिक मराठी आणि ज्युनिअर कॉलेज विभागाचा वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रमुख अतिथी कवयित्री प्रतिभा सराफ यांनी प्रत्येक अडथळा काही तरी नवीन गोष्ट शिकवतो, संशोधनास जागा निर्माण करतो म्हणून अडचणींचे अडथळ्यांचे आपण स्वागत केले पाहिजे असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.



प्रत्येकात एक चांगला गुण असतोच तो ओळखता यायला हवा. माणसे जोडल्याने देश जोडला जाईल. शाळेचे दिवस हे आपल्या आयुष्यातील सर्वात सुंदर दिवस असतात, आपले छोटे विचार सुद्धा खूप मोठे शास्त्रज्ञांसारखे काम करू शकतात, पालकांनी आपल्या मुलांच्या वाढदिवसाला एक तरी पुस्तक भेट द्यावे, असे विचार कवयित्री प्रतिभा सराफ यांनी व्यक्त केले. तसेच त्यांनी 'विद्यार्थी देवा' ही कवितादेखील सादर केली. नवी मुंबईतील प्रसिद्ध कवी वैभव वऱ्हाडी यांनी 'सोबत होती वेळ' ही कविता सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. तसेच यावेळी सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांना बक्षिसे देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. या कार्यक्रमात पारितोषिक विजेत्या विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास कवयित्री पुष्पा कोल्हे, पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ, माजी कार्याध्यक्ष प्रा. कृष्णाजी शिरकांडे, कल्पना शिरकांडे, सर्व विभागाच्या मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, समन्वयक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## बेलापूरमध्ये साजरा होणार दीपोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या येथे सोमवारी श्रींच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. याचे औचित्य साधत रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त बेलापूर नवी मुंबई येथे प्रभू रामजन्म सोहळा, महाआरती आणि दीपोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. आमदार मंदा म्हात्रे यांनी या उत्सवाचे आयोजन केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारतीयांना दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार नवी मुंबईत देखील विविध कार्यक्रमांची जंत्री असणार आहे. यात सीबीडी बेलापुर सेक्टर १ येथील सुनील गावस्कर मैदानात सायंकाळी दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

## थ्रीडी लाइव्ह रोबोटिक सर्जरी कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

अपोलो नवी मुंबईत पहिली यशस्वी 'थ्रीडी लाइव्ह रोबोटिक सर्जरी इन थोरॅसिक ऑन्को सर्जरी कार्यशाळा' संतोष मराठे-रिजनल सीईओ- वेस्टर्न रिजन, अपोलो हॉस्पिटल्स, डॉ. किरण शिंगोटे-युनिट हेड, यांच्या उपस्थितीत झाली.

कार्यशाळेत थोरॅसिक ऑन्कोलॉजीमधील थ्रीडी लाइव्ह रोबोटिक शस्त्रक्रियाचा समावेश होता. रोबोटिक एसोफेजेक्टॉमी, रोबोटिक थायमेक्टॉमी आणि रोबोटिक न्यूमोनेक्टोमी तज्ञ रोबोटिक सर्जन, डॉ. अनीज डीबी अहमद, डॉ. अभिजित दास, डॉ. विश्वास पै, डॉ. सुहैब झैदी, डॉ. विजयराज पाटील आणि तज्ञ ऑन्कोलॉजी, पल्मोनोलॉजी आणि गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी डॉक्टरांद्वारे संवादात्मक चर्चा, पॅनेल चर्चा आणि थेट प्रश्न उत्तर सत्रे घेण्यात आली.

## पनवेलमध्ये जिजाऊंच्या नावाने सामाजिक भवन उभारण्याची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये राजमाता जिजाऊंच्या नावाने सांस्कृतिक व सामाजिक भवन उभारण्यात यावे, अशी महत्त्वपूर्ण मागणी स्त्री शक्ती फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल मनपा आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदन दिले आहे.

राजमाता जिजाऊ यांच्या नावाने पनवेलमध्ये सांस्कृतिक व सामाजिक भवन उभारण्यात यावे, या मागणीचा प्रस्ताव स्त्री शक्ती फाउंडेशनच्या वतीने आयुक्त देशमुख यांना दिल्यानंतर फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष विजया कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेतली व त्यांना पत्र दिले. त्या बाबतीत त्यांनीही सकारात्मक भूमिका मांडून त्यांच्या मार्फतही आयुक्तांकडे पत्रव्यवहार करण्यात येईल व प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल, अशी ग्वाही दिली.



## सानपाडा येथे सायबर क्राईम जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील सुयोग समूह संस्थेतर्फे सायबर क्राईम जनजागृती या विषयावर आयोजित कार्यक्रमात व्याख्याते डॉ. विशाल माने सहा. पोलीस निरीक्षक विशेष शाखा नवी मुंबई यांनी मार्गदर्शन केले.

व्याख्यानामधील महत्वाचे मुद्दे खोटी प्रोफाइल तयार करून अनेकांना अश्लील संदेश, चित्रे पाठवणे, अकाउंट हॅक करणे, चॅटिंग करताना फसवणे, व्यक्तीला लग्नाच्या जाळ्यात अडकवणे, लैंगिक चाळे करणे, भेटायला बोलावून फसवणूक करणे यासारख्या गंभीर प्रकारांचा सायबर गुन्ह्यांमध्ये समावेश होतो. संगणकाचा उपयोग हा दुधारी शस्त्राप्रमाणे केला जातो. सर्व विषयांवर सखोल माहिती सोप्या भाषेत समजावून सांगितली. तसेच डॉ माने यांनी नागरिकांच्या प्रश्नाची समाधानकारक उत्तरे दिली.

या वेळी सानपाडा नगरीतील बहुसंख्य नागरिक महिला आणि युवा पिढी, बँकेचे कर्मचारी, गार्डन ग्रुपचे सर्व सदस्य, ज्येष्ठ विरंगुळा केंद्र सानपाडा सर्व सदस्य, सोमनाथ वासकर,भाऊ भापकर आणि सुयोग समूह संस्थेचे सदस्य, महिला सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे निवेदन अजय पवार यांनी केले.



## फडके विद्यालयात रंगवेध चित्रकला प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचालित आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात मएसो कलावर्धिनी अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांनी काढलेल्या निवडक सुंदर मुक्तचित्रांचे भव्य रंगवेध चित्रकला प्रदर्शन येत्या २४ ते २६ जानेवारी या कालावधीत होणार आहे.

संस्थेच्या १३ प्राथमिक व १८ माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या व कलाशिक्षकांच्या निवडक ४०० चित्रांचे प्रदर्शन मांडण्यात येणार आहे. चित्रकला कार्यशाळेचे आयोजनही केले आले आहे. सुलेखनकार अच्युत पालव यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे.

बक्षीस वितरण चित्रकार मारूती शेळके यांच्या हस्ते होणार आहे. हे चित्रकला प्रदर्शन सर्वांसाठी सकाळी १० ते सायंकाळी ७ पर्यंत निःशुल्क खुले असणार आहे, अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका समिता सोमण यांनी दिली आहे.

## कला क्रीडा महोत्सव उत्साहात सुरुवात

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने सीबीडी येथील सुनील गावस्कर मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव - २०२४ उत्साहात प्रारंभ झाले. महोत्सवाचे उदघाटन नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते झाले. तसेच या महोत्सवाची सुरुवात ही महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ आयोजित करून सुरुवात केली.

या वेळी माजी महापौर जयवंत सुतार, माजी नगरसेविका सरोज पाटील व पंजाब कल्चरल वेफेयर असोसिएशनचे अध्यक्ष कमल शर्मा यांनी नागरिकांना संभोधित केले. तसेच आमदार मंदा म्हात्रे यांनी प्रास्ताविक भाषण केले.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, सालाबादप्रमाणे यावर्षीही श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव-२०२४ चे आयोजन करण्यात आलेले आहे. श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्थेच्या वतीने गेली २७ वर्षे समाजपयोगी, शैक्षणिक, व सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्य, संगीत व विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. हा महोत्सव हा निशुल्क असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व महोत्सवाचा आनंद लुटावा.

या वेळी माजी विरोधी पक्षनेते पंढरीनाथ पाटील, माजी नगरसेवक दीपक पवार, माजी नगरसेवक अशोक गुरखे, माजी नगरसेवक डॉ. जयाजी नाथ, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, माजी नगरसेवक साबू डेनियल, माजी नगरसेविका शुभांगी पाटील, माजी नगरसेविका शशिकला पाटील, डॉ. राजेश पाटील, माजी जिल्हाध्यक्ष सी.व्ही. रेड्डी, माजी परिवहन सदस्य काशिनाथ पाटील, बलबीर चौधरी, पंजाब वेलफेयर कल्चरल असो अध्यक्ष कमल शर्मा, दत्ता घंगाळे, गोपाळ गायकवाड, विकास सोरटे, प्रताप भोसकर तसेच असंख्य ज्येष्ठ नागरिक, महिला व नागरिक उपस्थित होते.

## बोरांवर प्रभू श्रीरामांची प्रतिमा

**नवी मुंबई : बातमीदार**

अयोध्येतील श्रीराम मंदिर सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर भारती विद्यापीठ प्रशाला व ज्युनिअर कॉलेज नवी मुंबई शाळेतील उपक्रमशील कलाशिक्षक नरेश लोहार यांच्या संकल्पनेतून १०० विद्यार्थ्यांनी प्रभू श्रीरामांची बोरांवर चित्रकलेच्या माध्यमातून अनोख्या प्रतिमा साकारलेल्या आहेत, तसेच काही विद्यार्थ्यांनी जय श्रीराम असे अक्षरलेखनही रेखाटले आहे.




कलाशिक्षक नरेश लोहार यांनी प्रभू श्रीराम आणि शबरी यांचे चित्र बोरांवर रेखाटले आहे. कलाशिक्षक आणि विद्यार्थी यांच्या या अनोख्या कलाकृतीतून श्रीरामाच्या भक्तीचा सुगंध परिसरामध्ये दरवळत असताना श्रीरामाचा जयघोष केला आहे. याही अगोदर दसऱ्याच्या मुहूर्तावर आपट्याच्या पानावर शंभर विद्यार्थ्यांनी प्रभू श्रीरामांचे चित्र रेखाटले होते.

या अनोख्या उपक्रमाबद्दल भारती विद्यापीठ नवी मुंबई शैक्षणिक संकुलाचे संचालक डॉ. विलास कदम, विद्यालयाचे प्राचार्य आर. टी. बेल्लम, उपप्राचार्य आर. एच. कदम यांनी कलाशिक्षक नरेश लोहार व सर्व विद्यार्थी -कलाकारांचे अभिनंदन केले आहे.



## भाजप वर्कर्स फ्रंटच्या सरचिटणीसपदी नायडू



**नवी मुंबई : बातमीदार**

भाजपचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी नवी मुंबई भाजपा जिल्हा कामगार आघाडीच्या सरचिटणीस (महामंत्री) तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी सुहासिनी नायडू यांची नियुक्ती केली.

नायडू यांनी युवती मोर्चाचे अध्यक्षपददेखील सांभाळले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांची भाजप वर्कर्स फ्रंटच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नियुक्तीनंतर पत्रकारांशी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली विकासकामे व निर्णय सर्व सामान्य माणसापर्यंत पोहचवून पक्ष बांधणीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सुहासिनी नायडू यांनी सांगितले. केंद्र सरकारने महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या धोरणात्मक निर्णयानुसार भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीत महिलाचादेखील सहभाग असावा यातूनच सुहासिनी नायडू यांची जिल्हा कार्यकारिणीत नियुक्ती करण्यात आली असल्याचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी सांगितले.

## कोठारी स्कूलच्या शाखेचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

दोन दशकांहून अधिक वर्षे उत्कृष्ठ शिक्षण देण्यासाठी सुप्रसिद्ध असणारे कोठारी इंटरनॅशनल स्कूलच्या चौथ्या शाखेचे उद्घाटन येथील करंजाडे वसाहतीमध्ये झाले. पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते फीत कापून शाळेचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी करंजाडे ग्राम पंचायतीचे सरपंच मंगेश शेलार आणि भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष बळीराम म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कोठारी इंटरॅशनल स्कूल या शिक्षण संस्थेची पहिली शाळा नोएडा येथे गेल्या वीस वर्षांपूर्वी उभारली गेली. आयएससीई, आय बी, सीबीएससी, केंब्रिज अशा विविध अभ्यासक्रम येथील शाळेत अंतर्भूत आहेत. गेल्या पंधरा वर्षांपासून पुणे येथे दोन शाळा यशस्वीरित्या विद्यार्थी घडविण्याचे कार्य करत आहेत. या व्यातरिक्त मुंबईमध्ये मालाड आणि प्रभादेवी येथे दोन प्री प्रायमरी शाळा कार्यान्वित आहेत. संपूर्ण अध्ययन प्रणाली असणारी चौथी शाळा करंजाडे येथे कार्यान्वित झाली आहे.



**पनवेल : श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या येथे श्रीरामाच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. त्यानिमित्त शहरातील मिरची गल्ली येथील राम मंदिर परिसरात महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या पाठपुराव्याने रस्ता डांबरीकरण करण्यात आले.**

निवडक

## हिरवळ महाविद्यालयात सेमिनार



**माणगाव :** हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सीएस, आयटीमधील सीएस व आयटी विभागामार्फत आयटी क्षेत्रातील असणाऱ्या करिअर संधीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर सेमिनारचे आयोजन शनिवारी (दि.१३) आयोजित करण्यात आले होते. या सेमिनारसाठी प्रमुख अतिथी म्हणून पुण्यातील एका प्रतिष्ठित कंपनीतील आदित्य देशमुख हे उपस्थित होते, तसेच महाविद्यालयाचे प्रा. सुदेश कदम, उपप्राचार्य राकेश वडवलकर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रा. सुदेश कदम यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

## रोह्यात वृद्धांना ब्लँकेट वाटप



**धाटाव :** रोहा तालुक्यातील भारतीय जनता पक्षात नव्याने प्रवेश केलेल्या तळाघर गावातील युवा कार्यकर्ते रितेश कीर्तने त्याच्या वाढदिवसानिमित्त भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून बुधवारी (दि.१७) तळाघर गावातील गरीब व गरजू अशा वृद्धांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. या वेळी दक्षिण रायगड युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, दक्षिण रायगड महिला चिटणीस श्रद्धा घाग, विद्यार्थी आघाडी संपर्क प्रमुख वैभव कुलकर्णी, राकेश चाफेकर, संकेत मोरे, धिरज मोंढे, विशाल मोरे, प्रथमेश मुंढे, राहुल किर्तने, राकेश मोंढे, अक्षय कळंबे,राज ठाकुर, सत्यवान निंबरे, आर्यन ठाकूर, आर्यन कमाने, विराज मोरे यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोनाली राजेंद्र तेटगुरे हिचा सत्कार



**माणगाव :** तालुक्यातील सोनाली राजेंद्र तेटगुरे हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन तिने ओबीसी प्रवर्गात संपूर्ण महाराष्ट्रातून पहिल्या पाच क्रमांकात येण्याचा मान मिळविला. या उज्ज्वल यशाबद्दल तालुका पत्रकार संघातर्फे तिचा शनिवारी (दि.२०) संघाचे अध्यक्ष सलीम शेख, ज्येष्ठ मार्गदर्शक खेमचंद मेथा, कार्याध्यक्ष मजिद हाजिते, सल्लागार प्रभाकर मसुरे आदींनी तिच्या निवासस्थानी जाऊन शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या वेळी सोनालीचे वडील राजेंद्र तेटगुरे, आई रश्मी तेटगुरे, कृषि अधिकारी प्रमोद देशमुख, सेवानिवृत्त शिक्षक सुधाकर पालकर, बाळ उभारे, रमेश केकाणे, गणपत पालकर, काशीराम पालकर, नंदू खाडे, संजय खाडे, गणेश शिंदे, उत्तम कदम, नातेवाईक व मित्रमैत्रिणी परिवार उपस्थित होते.



**खोपोली : नगर परिषद अग्निशामक दलाच्या वतीने शहरातील प्रमुख रस्त्यांवर पाणी मारून स्वच्छ करण्यात येत आहे.**

# मुरूड एकदरा पुलाच्या कामाला सुरुवात

### स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड-एकदरा हा अलिबाग व मुरूड तालुक्याला जोडणारा महत्त्वाचा पूल असून ९० वर्षे जुना आहे. या पुलाची अत्यंत दूरवस्था झाली होती. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या पुलाच्या दुरूस्तीचे काम शनिवारी (दि. २०) सुरू करण्यात आले आहे. पुलाचे काम सुरू झाल्याने स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या पुलावरून एकदरा, माझेरी, राजपुरी, खोरा, डोंगरी परिसरातील सर्व ग्रामस्थ मुरूड शहराकडे रोज ये- जा करीत असतात, तसेच या पुलावरुन पर्यटक ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी ये-जा करीत असतात. गेली अनेक वर्षे हा पूल नादुरूस्त होता, परंतु आता या पुलाला पुनर्जीवन मिळणार आहे.

या पुलावरचे संरक्षक कठडे व बेरींग पूर्णतः खराब झाल्याने मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले होते. त्या वेळी या पुलासाठी राज्य शासनाकडून विशेष रक्कमेची तरतूद करण्यात आली.

या संदर्भात आहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाने वरिष्ठ विभागाकडे कळविण्यात आले होते. मागील अर्थसंकल्पामध्ये तरतूद करून या पुलाच्या दुरूस्तीकरिता चार कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हे काम ठाणे येथील संरचना या कंपनीला देण्यात आले असून दुरूस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे.

संरचना कंपनीचे इंजिनिअर प्रशांत कांबळे यांनी सांगितले की, संपूर्ण पुलाचे मजबुतीकरण होणार आहे. हे काम करीत असताना रस्ता बंद होणार नाही याची काळजी आम्ही घेणार आहोत, तसेच हे काम कमीत कमी चार महिने चालणार आहे.




## माथेरानचा पारा १३ अंशांवर; पर्यटकांसह स्थानिकांनीही घेतला गुलाबी थंडीचा अनुभव

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानचे तापमान दोन-तीन दिवसांपूर्वी १३ अंश इतके खाली आले होते. दोन वर्षांपूर्वी २४ जानेवारी रोजी ७.६ अंश सेल्सिअस एवढा खाली पारा आला होता. गतवर्षी १४ जानेवारी रोजी माथेरानचे हवामान ११.६ अंश इतके खाली आले होते. माथेरानमध्ये गुलाबी थंडी अनुभवण्यासाठी पर्यटक येत असतात आणि त्यामुळे माथेरानमधील पर्यटन वाढीसाठी थंडीची चाहूल आणि माथेरान गारठणे हे सुचिन्ह समजली जात आहेत.

माथेरान हे २६३६ फुट उंचावर असलेले ब्रिटिशांनी शोधून काढलेले पर्यटनस्थळ आहे. हे ठिकाणी मुंबई-पुण्यापासून जवळचे पर्यटनस्थळ असून घनदाट झाडी आणि जंगलाने व्यापलेले हे पर्यटनस्थळ अधिकच खुलून दिसते. यामध्ये दिवसागणिक येथील तापमानाचा पारा खाली येऊ लागला आहे. या वर्षातील हे कमी तापमान असल्याचे माथेरान नगर परिषदेचे कर्मचारी अन्सार महापुळे सांगतात.



सध्याची कडाक्याच्या गुलाबी थंडीचा अनुभव घेतला आणि पारा आणखी खाली येईल अशी शक्यता असल्याने पर्यटक माथेरानला येतच आहेत. दोन दिवसांपूवी माथेरानचे हवामान एवढे थंड होते की, पारा इतका खाली आला की, भर उन्हातसुद्धा थंडी जाणवत होती. सकाळपासून थंडीचा जोर होता तो संध्याकाळपर्यंत वाढतच गेला. त्यात विकेंड असल्याने पर्यटकांसह स्थानिकांनीही या गुलाबी कडाक्याच्या थंडीचा अनुभव घेतला.

माथेरानच्या इतिहासातील सर्वात जास्त थंडी २०२२मध्ये २४ जानेवारी रोजी होती. त्यावेळी पारा तब्बल ७.६ अंश इतका खाली आला होता, तर २०२२मध्येच १० जानेवारी रोजी १०.६ अंश तर ९ जानेवारी २०२२ रोजी १३.६ अंश आणि २ डिसेंबर २०२१ रोजी पारा १४.८ अंश इतका खाली आला होता. १६ जानेवारी रोजी माथेरानचा पारा १४ अंश इतका खाली आला होता. १७ जानेवारी रोजी हा पारा १३.६ अंश होता आणि १८ जानेवारी रोजी हा पारा १३ अंशावर होता.

**माथेरानची थंडी आम्ही पूर्वीपासून अनुभवली आहे, मात्र आता तापमान मोजण्याची यंत्रणा कार्यान्वित झाल्याने पारा खाली गेला आहे हे माहिती पडू लागले आहे. त्याचा फायदा पर्यटक वाढीसाठी होणार आहे.**

**-अनिस शेख, व्यावसायिक**

## पालीत भरवस्तीत रानडुक्करांचा मुक्त संचार



**पाली : प्रतिनिधी**


अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात रात्री रानडुक्करे शिरली होती. येथील मराठा समाज हॉलजवळ भर वस्तीत ही रानडुक्करे मुक्त संचार करताना स्थानिकांनी पाहिली. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

पाली शहर सरसगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसले आहे. सरसगडावर व पायथ्याशी रानडुक्करांचा वावर आहे. येथील माजी वनपाल व रहिवासी रवींद्र नागोठकर यांनी सर्वप्रथम ही डुक्करे रात्री येथील परिसरात फिरताना पाहिली व त्यांनी आजूबाजूच्या लोकांना यासंदर्भात माहिती देऊन सतर्क केले. त्यानंतर सर्व रहिवाशांनी घराचे दरवाजे लावून घेतले. पुन्हा ही डुकरे मानवी वस्तीत येतील का, अशी भीती लोकांना वाटत आहे.

**ही खरेच रानडुक्करे होती का याची शहानिशा करावी लागेल. नागरिकांनी रात्री फिरताना सावधानता बाळगावी, तसेच कोणीही त्यांच्या वाटेत येऊ नये. रानडुक्करे दिसल्यास वनविभागाला संपर्क करावा.**

**-विकास तरसे, वनक्षेत्रपाल, पाली-सुधागड**

## नांदगाव हायस्कूलमध्ये गुजरात राज्य दिन साजरा





**मुरूड : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथे गुजरात राज्य दिन साजरा करण्यात आला. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी गुजरात राज्यातील विविध सांस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत गुजराती पेहराव, विविध प्रकारचे पदार्थ जिलेबी, फापडा, ढोकळा तसेच विविध खाद्यपदार्थाची रेलचेल करण्यात आली.

गरबा नृत्य, दांडिया, पतंग उडवणे आदी कार्यक्रम विद्यार्थ्यांनी उत्साहात साजरे केले. लहान मुलांनी पतंग उडवण्याचाही आनंद लुटला. यासाठी मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, पर्यवेक्षक अर्चना खोत, सहाय्यक शिक्षक सागर राऊत, प्रतीक पेडणेकर व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. या वेळी विविध स्पर्धाही घेण्यात आल्या.

वेशभूषा स्पर्धेत प्रथम एंजल नाक्ती, द्वितीय श्रेया शेळके, तृतीय इच्छा दिवेकर यांना प्राप्त झाला. पतंग उडवणे स्पर्धेत प्रथम स्वराज पाके, द्वितीय सार्थक माळी, तृतीय सार्थक घाग; वेशभूषा प्रथम अदिती कुमरोटकर, द्वितीय प्रीती म्हात्रे, तृतीय श्रेया पाटील, उत्तेजनार्थ गणराज बानकोटकर; गुजराती पदार्थ बनवणे इ. पाचवी ते सातवी गटात प्रथम अवनी तांबोली, द्वितीय एंजल नाक्ती, तृतीय रिया आरकर, उत्तेजनार्थ रुई आरेकर; आठवी ते दहावी गट प्रथम मुग्धा नांदगावकर, द्वितीय सलोनी चौगले, तृतीय निधी पवार, उत्तेजनार्थ सई चोरघे या सर्व विद्यार्थ्यांना विविध भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

## अष्टमी रेल्वेफाटकाला पर्यायी मार्गासाठी अधिकाऱ्यांकडून पाहणी

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या रोहा तालुक्यातील अष्टमी रेल्वेफाटकाचा नागरिकांना त्रास होत होते. अष्टमी रेल्वे फाटकाला पर्यायी मार्गाची मागणी निडीतर्फे अष्टमी व पश्चिम खोऱ्यातील नागरिकांची होती. या मागणीनुसार खासदार सुनील तटकरे यांनी बैठक घेऊन रेल्वे अधिकारी, ठेकेदार व महसूल प्रशासनाला पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी सूचना दिल्या. या पर्यायी मार्गाची पाहणी रेल्वेचे अधिकारी पश्चिम खोऱ्यातील नागरी व महसूल प्रशासनाने केली.

या वेळी नायब तहसीलदार राजेश थोरे, रेल्वे अधिकारी सचिन कुमार, ओबीसी जनमोर्चाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश मगर, कोळी समाज नेते नवनीत डोलकर, सरपंच अक्षरा डोलकर, उपसरपंच उत्तम नाईक, माजी सरपंच संदिप चोरगे, पोलीस पाटील, मंडळ अधिकारी भरत सावंत, तलाठी विशाल चोरगे, मंगेश चोरगे, सुनील चोरगे आदी उपस्थित होते.



अष्टमी रेल्वे फाटक सतत पडत असल्यामुळे नागरिकांना होणारा त्रास पहाता कोळी समाजनेते नवनीत डोलकर यांनी अष्टमी रेल्वे फाटकाला पर्यायी मार्गाची मागणी केली होती. या संबंधित महसुल प्रशासन, पोलीस प्रशासन व लोकप्रतिनिधींना निवेदन दिले होते.

खासदार सुनील तटकरे यांच्याकडे अष्टमी रेल्वे फाटकाला पर्यायी मार्गाची मागणी केल्यानंतर त्यांनी महसूल प्रशासन, रेल्वे अधिकारी व पश्चिम खोरे येथील नागरिकांची बैठक सुतारवाडी येथे बोलाविण्यात आली होती. महसूल प्रशासनाचे अधिकारी, रेल्वेचे अधिकारी, संबंधित ठेकेदार व नागरिकांनी पर्यायी मार्गाची पाहणी केली हा रस्ता लवकरात लवकर होणार असल्याचे सांगितले.

## कर्जतच्या मातीचे इस्त्रायलच्या राजदुतांकडून कौतुक

**कर्जत : प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रात प्रगत देश म्हणून इस्त्रायल जगाच्या नकाशावर अधोरेखित आहे. अशात इस्त्रायलचे भारतातील वाणिज्य राजदूत कॉब्बी शोशानी यांनी नुकतीच कर्जत तालुक्यातील सगुणाबाग येथे भेट दिली. या भेटीवेळी त्यांनी येथील एसआरटी लागवड पद्धत जाणून घेतानाच येथील मातीला विशिष्ट सुगंध असल्याचे म्हणत मातीचे दिलखुलासपणे कौतुक केले.

नेरळ येथील सगुणाबाग हे केवळ कृषी पर्यटन केंद्र नाही तर शेतकऱ्यांसाठी कायम विद्यापीठ राहिले आहे. शेतकऱ्यांसाठी नवेनवे प्रयोग सगुणाबागचे निर्माते कृषिभूषण शेतकरी चंद्रशेखर भडसावळे यांनी केले आहेत.



त्यामुळे जगभरातून या प्रयोगाची पाहणी करण्यासाठी शास्त्रज्ञ येत असतात. सन २०११ रोजी संशोधन केलेल्या एसआरटी म्हणजेच सगुणा रिजनरेटिव्ह तंत्रज्ञानाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कष्ट व खर्च कमी करून उत्पादनात कमालीची वाढ केली आहे. त्यामुळे शेतकरी आनंदी व आत्मविश्वास होऊ लागले आहेत, तर हे तंत्रज्ञान महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आत्मसात करून महाराष्ट्रभर या पद्धतीने शेती केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर इस्त्रायलचे वाणिज्य राजदूत कॉब्बी शोशानी यांनी सगुणा आपल्या सहकाऱ्यांसह अचानक सगुणाबाग येथे भेट दिली. वाहनातून उतरल्या उतरल्या त्यांनी येथील माती हातात घेऊन या मातीला असीम सुगंध येत असल्याचे सांगितले, तर यांसह त्यांनी सगुणा रिजनरेटिव्ह तंत्रज्ञान याठिकाणी कसे काम करते याची माहिती खुद्द शेतात उतरून भडसावळे यांच्याकडून करून घेतली, तसेच कृषिभूषण शेतकरी चंद्रशेखर भडसावळे यांनी १९८९ साली इस्त्राएल येथे भेट देऊन तेथील आंबा लागवड पद्धत सगुणाबाग येथे राबवली होती. याठिकाणी आंबा लागवड ही इस्त्रायल पद्धतीने केल्यामुळे अंतरातदेखील कमालीचा फरक पडून उत्पादनात वाढ झाल्याचे भडसावळे यांनी सांगितले, तसेच इस्त्रायल पद्धतीने मत्सशेती येथे केली जात आहे.

या सगळ्याची माहिती राजदूत शोशोनी यांनी घेतली. याबद्दल त्यांनी कौतुक देखील करतानाच आपल्या देशातील शास्त्रज्ञांना या ठिकाणी लवकरच हे तंत्रज्ञान पाहण्यासाठी आम्ही अभ्यास दौरा आयोजित करू असू आश्वासन देखील त्यांनी यावेळी बोलताना दिले. याप्रसंगी इस्त्रायल राजदूत शोशोणी यांच्या दौऱ्यानिमित्त नेरळ सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे बंदोबस्तासाठी जातीने उपस्थित होते.

## मोरे महिला महाविद्यालयाचा उडान महोत्सवात सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन विस्तार विभागाच्या उडान महोत्सवाचे आयोजन गुरुवारी (दि. १८) भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण येथे करण्यात आले. या महोत्सवामध्ये रायगड जिल्हयातील २० महाविद्यालय सहभागी झाले होते.

उडान महोत्सवात मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागामार्फत पथनाट्य, पोस्टर, वक्तृत्व, निबंध आणि सर्जनशील लेखन या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून सामाजिक, महीला सक्षमीकरण, पर्यावरण, करिअर, अन्नपूर्णा आदी विषयांना अनुसरून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी हक्काचे व्यासपीठ देण्यात येते. मोरे महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी महिला सक्षमीकरणाला अनुसरून शोध - अस्तित्वाचा या पथनाट्याचे रंगमंचावर सादरीकरण करण्यात आले.

मोरे महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी गायत्री गिरप हिला सर्जनशील लेखन या स्पर्धेत उत्तेजनार्थ प्रमाणपत्र देण्यात आले. महाविद्यालयाच्या १० विद्यार्थिनी आणि प्रा. हणमंत ढवळे सहभागी झाले.

# टाटा मुंबई मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद







## अर्ध मॅरेथॉनमध्ये आर्मीचा दबदबा

**मुंबई : प्रतिनिधी**

आशियातील सर्वात मोठी आणि बहुचर्चित टाटा मुंबई मॅरेथॉन-२०२४ आयोजित स्पर्धेला राज्यपाल रमेश बैस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. २१) झेंडा दाखवून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत अर्ध मॅरेथॉनच्या विजेत्यांमध्ये भारतीय लष्करातील (आर्मी) अधिकाऱ्यांचा दबदबा होता. पूर्ण मॅरेथॉन पुरुष गटात प्रथम हायली लेमी (इथोपिआ), द्वितीय हेमानॉट अल्यू (इथोपिआ), तृतीय मित्कु तफा (इथोपिआ); महिला गटात प्रथम अबेराश मिनसिवो (इथोपिआ), द्वितीय मूलूअबट तेसगा (इथोपिआ), तृतीय मेधिन बेजेनी (इथोपिआ) यांनी पटकाविला. भारतीय गटात प्रथम श्रीनु बुगाथा, द्वितीय गोपी थोनकल व तृतीय शेरसिंह तन्वर यांनी पटकाविला.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित कार्यक्रमास राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार आशिष शेलार, पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, देवेन भारती, मुंबई मनपा आयुक्त इकबालसिंह चहल, पश्चिम नौसेना मुख्यालयाचे मुख्य ध्वज अधिकारी व्हाईस ॲडमिरल संजय सिंह, महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा क्षेत्राचे जनरल ऑफिसर कमांडिंग मेजर जनरल एच. एस. काहलों यांनी उपस्थित राहून सर्व स्पर्धकांचा उत्साह वाढवला.

या मॅरेथॉनमध्ये एकूण ५९,५१५ स्पर्धकांनी भाग घेतला. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय धावपटू सहभागी झाले. ऑलिम्पिक पदक विजेती आणि दोन वेळची जगज्ञेती पोल व्हॉल्टपटू केटी मून ही या टाटा मुंबई मॅरेथॉन २०२४ची आंतरराष्ट्रीय ॲम्बेसेडर आहे.

४२.१९५ किमीची मुख्य मॅरेथॉन ही पहाटे ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुरू झाली होती. २१.०९७ किमीची अर्ध मॅरेथॉन ही पहाटे ५ वाजता माहिम रेतीबंदर, माहीम कॉजवे इथून सुरू झाली होती, तर १० किमीची मॅरेथॉन सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून सुरू झाली. हाफ मॅरेथॉनमध्ये (२१.९७ किलमी) प्रथम सावन बरवाल एक तास पाच मिनटे सात सेकंद, द्वितीय किरण म्हात्रे एक तास सहा मिनटे २३ सेकंद, तृतीय मोहन सैनी एक तास सहा मिनटे ५५ सेकंद यांनी पटकाविले. विशेष म्हणजे हे तीनही विजेते भारतीय लष्करामध्ये कार्यरत आहेत.

महिला हाफ मॅरेथॉन (२१.९७ किमी) प्रथम अमरीता पटेल एक तास १९ मिनटे २० सेकंद, द्वितीय पूनम दिनकर एक तास १९ मिनटे २० सेकंद, तृतीय कविता यादव एक तास २० मिनटे ४५ सेकंद यांनी पटकाविला.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, टाटा मॅरेथॉन ही जगातील अतिशय प्रतिष्ठित मॅरेथॉन असून गेली १९ वर्षे तिचे यशस्वी आयोजन होत आहे. यंदा या स्पर्धेत ५९ हजाराहून अधिक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. आपल्या वयाच्या आणि शारीरिक मर्यादांचा विचार न करता सर्व वयोगटातील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होतात हे या स्पर्धेचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य असल्याचे मत या वेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले.

### खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा

## कबड्डीमध्ये मुलांची उपांत्य फेरीत धडक

**चेन्नई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या कबड्डी संघांना खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत शनिवारी (दि. २०) संमिश्र यशास सामोरे जावे लागले.

मुलांच्या गटात महाराष्ट्राने मध्यप्रदेशवर ४१-२६ असा शानदार विजय नोंदवित उपांत्य फेरीकडे वाटचाल केली, मात्र लागोपाठच्या दोन पराभवामुळे महाराष्ट्राच्या मुलींचे आव्हान साखळी गटातच संपुष्टात आले.

चेन्नई येथील जवाहर नेहरू इनडोअर स्टेडियम येथे शनिवारी झालेल्या मुलांच्या गटाच्या लढतीमध्ये महाराष्ट्राने मध्यप्रदेशाला १५ गुणांच्या फरकाने पराभूत केले. मध्यंतरापूर्वी दोन्ही संघांनी आक्रमक खेळ केला, मात्र मध्यंतराला महाराष्ट्र संघाने १०-९ अशी केवळ एका गुणाची आघाडी राखली होती. मध्यंतरानंतर महाराष्ट्राच्या विकास जाधव, अनुज गावडे, गजानन कुरे यांनी आपला खेळ उंचावताना जोरदार चढाया आणि पकडी करताना ३१ गुण वसूल केले. यामुळे महाराष्ट्र संघाला मध्य प्रदेश संघावर दमदार विजय मिळविता आला.

मुलींच्या गटात महाराष्ट्राला यजमान तामिळनाडू संघाकडून ३२-४१ असा नऊ गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. मध्यंतराला तामिळनाडू संघाने २१-११ अशी १० गुणाची आघाडी घेतली होती. मध्यंतरानंतर महाराष्ट्राने खेळ उंचवला, परंतु तोपर्यंत हातातून विजय निसटला होता. शुक्रवारी हरयाणा संघाकडून व शनिवारी तामिळनाडू संघाकडून पराभूत झाल्याने मुलींच्या गटातून उपांत्य उपांत्य फेरीत जाण्याच्या आशा संपुष्टात आल्या.




# लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयात रंगला नमो चषक खो-खो स्पर्धेचा थरार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा, महाराष्ट्र प्रदेशाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यातील उदयोन्मुख कलाकारांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नमो चषकचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नमो चषक २०२४ खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेला माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी (दि. २१) भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेली आंतरराष्ट्रीय भरारी आणि देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भाजप कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार युवा मोर्चाच्या संयोजनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा होत आहे. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयात खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



या वेळी कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, कामोठे भाजप ओबीसी मोर्चाध्यक्ष भाऊ भगत, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेटकर, चिटणीस किरण जाधव, युवा मोर्चा सरचिटणीस प्रविण कोरडे, युवा नेते गणेश भगत, हरजींदर कौर सिंग, युवा मोर्चा उपाध्यक्ष आदित्य भगत, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, रवींद्र म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## कर्जतमध्ये ऑर्गन डोनेट क्रिकेट कप

**कर्जत : प्रतिनिधी**

मरणोत्तर अवयवदान संकल्पासाठी ऑर्गन डोनेट कप २०२४चे आयोजन कर्जत येथील आमदार महेंद्र थोरवे क्रीडा संकुल येथे केले होते. या स्पर्धेचा शुभारंभ शनिवारी (दि. २०) आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, राजेश भगत, ॲड. राजेंद्र निगुडकर, महेंद्र निगुडकर, मधुकर सुर्वे, रणजीत जैन, राजेश ओसवाल, संदीप भोईर, ॲड. संकेत भासे, ॲड. महेश घारे, दिनेश कडू आदी उपस्थित होते.



४० +चे दहा संघ शनिवारी खेळले तर रविवारी फिफ्टी प्लसचे दहा संघ मैदानात उतरले होते. दिनेश कडू यांनी स्पर्धेचा उद्देश सांगितला. भाजप मंडल अध्यक्ष राजेश भगत यांनी, कर्जतमध्ये आयटी पार्क उभारल्यास तालुक्यातील मुले उच्चपदस्थ अधिकारी होतील, अशी मागणी केली. आमदार थोरवे यांनी, ४० + टीम मार्गदर्शकाचे काम करीत आहे. आपण राजकीय, सामाजिक मतभेद बाजूला ठेऊन काम करीत असून येथे पाच कोटी खर्च करून क्रीडासंकुलाची उभारणी होणार आहे. कर्जतचा विकास वेगळ्याप्रकारे करायचा संकल्प आहे. भविष्यात उल्हासनदीत बंधारा बांधून बोटिंग प्रकल्प करायचा आहे, असे स्पष्ट केले. त्यानंतर राजकीय संघ व प्रशासकीय संघामध्ये प्रेक्षणीय सामना चांगलाच रंगला. पंचाची कामगिरी पांडुरंग मोहिते, संदिप पाटील, जयवंत पिंगळे, प्रशांत शिंदे करीत आहेत. सूत्रसंचालन विकास चित्ते यांनी केले.

या स्पर्धेच्या वेळी अवयव दानाचा पहिला अर्ज ४०+चे क्रिकेटपटू संदीप देशमुख यांच्या मातोश्री सुंदर देशमुख यांनी भरला.

## हॅरी ब्रूक भारताविरुद्ध मालिकेतून बाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताविरुद्ध २५ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी इंग्लंड संघाला मोठा धक्का बसला आहे. इंग्लंडचा स्टार फलंदाज हॅरी ब्रूक भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेत सहभागी होणार नाही.

हॅरी ब्रूक वैयक्तिक कारणांमुळे इंग्लंडला परतत असून कसोटी मालिका खेळण्यासाठी तो पुन्हा येणार नसल्याचे इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने एक निवेदन जारी केले आहे. हॅरी ब्रूकच्या बदलीची घोषणा अद्याप ईसीबीने केलेली नाही, मात्र ब्रूकच्या अनुपस्थितीमुळे इंग्लंडला मोठा फटका बसणार आहे.

## आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत आरसीएफ शाळा चॅम्पियन

**रोहे : प्रतिनिधी**

डीईएस आंतरशालेय मैदानी क्रीडा स्पर्धा सांगली येथील श्री कांतीलाल पुरुषोत्तमदास शहा प्रशालेच्या भव्य मैदानावर १२ व १३ जानेवारी रोजी झाली. यामध्ये अलिबाग तालुक्यातील आरसीएफ शाळा चॅम्पियन ठरली आहे.

आरसीएफ शाळेतील १२, १४ व १७ वर्षांखालील मुले व मुली अशा एकूण ३९ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. यामध्ये १२ वर्षांखालील मुले यांनी जनरल चॅम्पियनशिप पटकावली, तर याच गटातील ध्रुव गणेश जामकर याला उत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. १२ वर्षांखलील मुले यामध्ये ध्रुव जामकर ८० मी. धावणे प्रथम व लांब उडी द्वितीय, आराध्य संजय म्हात्रे ८० मी. धावणे तृतीय, १२ वर्षांखलील मुली राणी लक्ष्मण ठाकूर ६०० मी. धावणे प्रथम, १४ वर्षांखालील मुले विशाल कौशलेंद्रकुमार सिंग ८० मी. हरडल्स प्रथम व उंचउडी द्वितीय, जीत किशोर पाटील १०० व २०० मी. धावणे प्रथम, १४ वर्षांखलील मुली ४×१०० मी. रिले, तृतीय श्रावणी रत्नाकर पाटील, पर्णवी अमोल मयेकर, चिन्मयी गणेश ओव्हल व शुभ्रा प्रसन्ना कटोर, रिया विरेश पाटील तर १७ वर्षांखलील मुले आर्यन रक्षण राऊत १०० मी. धावणे प्रथम व २०० मी. धावणे तृतीय, संगम कैलास कटारे लांब उडी द्वितीय, ४×१०० मी. रिले प्रथम, आर्यन रक्षण राऊत, विकास रामध्रुव चव्हाण, चिन्मय राकेश रोकडे, संगम कैलास कटारे, १७ वर्षांखालील मुली आर्या सुशील केंदकी २०० मी. धावणे तृतीय आदी विद्यार्थ्यांनी सुयश संपादन करून आरसीएफ शाळेसह रायगड जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.



# इंग्लंडला भारत 'विराटबॉल'ने उत्तर देईल

## माजी क्रिकेटपटूचे सुनील गावसकर यांचा विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच सामन्यांची कसोटी मालिका होणार आहे. या मालिकेतील पहिला सामना २५ जानेवारीपासून हैदराबादमध्ये सुरू होणार आहे.

इंग्लंड आता कसोटीमध्ये बॅझबॉल क्रिकेट खेळतो, यात इंग्लंड संघाचे प्रशिक्षक ब्रेंडन मॅक्युलम आणि कर्णधार बेन स्टोक्स यांचे योगदान आहे. या मालिकेपूर्वी माजी क्रिकेटपटू सुनील गावसकरांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेचा विषय ठरत आहे.



स्टार स्पोर्ट्सशी बोलताना भारताचे माजी कर्णधार गावसकर यांनी म्हणाले की, इंग्लंडकडे 'बॅझबॉल' असेल तर आमच्याकडे 'विराटबॉल' आहे. कोहली पुन्हा एकदा शानदार फलंदाजी करेल इंग्लिश गोलंदाजांचा भरपूर समाचार घेईल, असा विश्वास सुनील गावसकर यांनी व्यक्त केला आहे.

माजी क्रिकेटपटू सुनील गावसकर पुढे म्हणाले, इंग्लंडकडे बॅझबॉल असेल तर आमच्याकडे विराटबॉल आहे. इंग्लंड त्याच रणनीतीने खेळेल पण त्यांनी हे विसरू नये की, भारताकडे विराट कोहली आहे, जो त्यांची रणनीती बिघडवू शकतो. त्यामुळे मालिकेतील पहिला कसोटी सामना खूप महत्त्वाचा असणार आहे. कारण बॅझबॉलची खरी कसोटी फिरकीपटूंविरूद्ध असणार आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिका भारतीय खेळपट्ट्यांवर होणार आहे. भारतीय खेळपट्ट्यांवर बेसबॉल क्रिकेट खेळणे इंग्लंडसाठी इतके सोपे असणार नाही. या भारतीय खेळपट्ट्यांवर फिरकीपटूंना भरपूर साथ मिळते. हे पाहता रवींद्र जडेजा, आर. अश्विन आणि अक्षर पटेल या फिरकीपटूंचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. ज्यामुळे इंग्लंडला खूप त्रास होणार आहे. त्यामुळे ही मालिकाही भारत जिंकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# खासदार चषक २०२४ची रंगत

### परेश ठाकूर यांचे खेळाडूंना प्रोत्साहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदेश स्पोर्ट्स शिवाजीनगर यांच्या वतीने खासदार चषक २०२४चे आयोजन शिवाजीनगर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदानात करण्यात आले होते. या स्पर्धेला महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शनिवारी (दि.२०) भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले.

शिवाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत ३२ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविणाऱ्या संघास एक लाख आणि भव्य चषक, द्वितीय क्रमांक पटकविणाऱ्या संघास ५० हजार आणि भव्य चषक, तृतीय आणि चतुर्थ क्रमांक पटकविणाऱ्या संघास प्रत्येकी २५ हजार आणि भव्य चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

या वेळी रायगड टेनिस क्रिकेट संघटना अध्यक्ष तथा भाजप उत्तर रायगड उपाध्यक्ष राजेश गायकवाड, सुदीप ठाकूर, सुजित ठाकूर, मयूर ठाकूर, निलेश ठाकूर, मार्मिक ठाकूर, दैवत पाटील, शशिकांत कडू, शुभम ठाकूर, अमृत ठाकूर, अमित कडू, किसन मोकल, अमृत ठाकुर, चेतन मोकल, दीपेश ठाकुर, सुदेश ठाकुर, संदेश म्हात्रे, पंकज मोकल, प्रथमेश ठाकुर, शुभम ठाकुर, दिव्येश म्हात्रे, प्रयाग ठाकुर, अभित ठाकुर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com